


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ८० * नांदेड * गुरूवार, दि. २६ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

## महाराष्ट्राची हरित क्रांतीकडे वाटचाल, एसटी ताफा पूर्णपणे विद्युत होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५'अंतर्गत २०३५ पर्यंत एसटीच्या सर्व बस पूर्णपणे विद्युत करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला असून त्याची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली.

सरनाईक यांनी स्पष्ट केले की, वाढते प्रदूषण, इंधन दरातील अस्थिरता आणि बदलते जागतिक वातावरण यांचा विचार करता विद्युत वाहनांचा स्वीकार ही केवळ गरज नसून काळाची अपरिहार्यता बनली आहे. सुमारे १४ हजार बसचा ताफा असलेली एसटी ही ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी असून, या सेवेला आता 'हरित ऊर्जे'ची नवी ओळख देण्याचा संकल्प केला आहे.

या धोरणाअंतर्गत नागरिकांना विद्युत वाहन खरेदीसाठी कर सवलती देण्यात येणार असून, पथकर माफीमुळे प्रवास खर्चात मोठी बचत होणार आहे. राज्य व राष्ट्रीय महामार्गावर दर २५ किमी अंतरावर चार्जिंग सुविधा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय चार्जिंग पायाभूत सुविधांसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्यात येणार असून संशोधन, नवकल्पना आणि कौशल्य विकासालाही चालना दिली जाणार आहे. चार्जिंग स्थानकासाठी सौर ऊर्जे



चा वापर करण्यावर भर देण्यात येणार असून ऊर्जा निर्मितीपासून वापरापर्यंत संपूर्ण प्रक्रिया पर्यावरणपूरक करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे केवळ पर्यावरण संवर्धनालाच चालना मिळणार नाही, तर एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीतही मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. अर्थात, हरित ऊर्जेमुळे इंधन व देखभाल खर्चात बचत होईल. याबरोबरच ई-मोबिलिटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊन राज्यात देशात अग्रस्थानी राहील, असा विश्वास व्यक्त त्यांनी व्यक्त केला.

'डिझेलच्या धुरातून हरित ऊर्जेकडे' हा बदल केवळ तांत्रिक नसून विचारांतील परिवर्तन आहे. 'हरित महाराष्ट्र, सुरक्षित महाराष्ट्र आणि सक्षम एसटी' हेच शासनाचे अंतिम ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## इच्छामरणाच्या परवानगीनंतर ३१ वर्षीय हरीश राणा अनंतात विलीन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** गाझियाबादचे हरीश राणा ज्याला इच्छामरणाची परवानगी देण्यात आली होती, त्याच्यावर बुधवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

धाकटा भाऊ, आशिषने बुधवारी दिल्लीतील ग्रीन पार्क स्मशानभूमीत पार्थिवाला अग्नि दिला. वडील अशोक राणा (६२) यांनी मुलगा हरीशला अखेरचा निरोप देत हात जोडून रडणाऱ्यांना विनंती करत म्हणाले, रडू नका. माझ्या मुलाच्या आत्म्यास शांती लाभो, अशी मी प्रार्थना करतो. तो जिथे कुठे जन्मेल, तिथे देव त्याचे भले करो. ३१ वर्षीय हरीशने काल, २४ मार्च रोजी, दिल्लीतील एम्स (खखचड) येथे अखेरचा श्वास घेतला. तो १३ वर्षांपासून कोमात होता. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार कुटुंबाने हरीशची फुफ्फुसे, दोन्ही मूत्रपिंडे आणि कॉर्निया दान केले आहेत, ज्यामुळे सहा लोकांना नवीन जीवन मिळण्याची अपेक्षा आहे.

## रामनवमीनिमित्त जिल्हाभरात चोख पोलीस बंदोबस्त

### एसआरपीएफ १ कंपनी, आरसीपीच्या ६ प्लाटूनसह दीड हजार कर्मचारी तैनात

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात रामनवमीनिमित्त गुरुवार, दि. २६ मार्च रोजी ४ मिरवणुकांसह जिल्हाभरात ४० मिरवणुका काढण्यात येणार आहेत. या मिरवणुका शांततेत व उत्साहात पार पडाव्यात यासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. बंदोबस्त कामी एसआरएफ १ कंपनी, आरसीपी (दंगा विरोधी पथक) च्या ६ प्लाटूनसह दीड हजार पोलीस अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत, अशी माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिली.

नांदेड शहरासह जिल्हाभरात दरवर्षी रामनवमी उत्साहात साजरी केली जात आहे. रामनवमीची पूर्ण तयारी झाली आहे. दि. २६ मार्च रोजी शहरासह रामनवमीनिमित्त भव्य शोभायात्रा जिल्हाभरात काढण्यात येणार आहेत. त्या



पार्श्वभूमीवर अबिनाश कुमार बोलत होते. शहरात दुपारी १२ वाजता श्री राम मंदिर, रामघाट येथे महाआरती करण्यात येणार आहे. त्यानंतर गाडीपुरा येथील रेणुका माता मंदिर येथून दुपारी १.३० शोभायात्रेची भव्य सुरुवात होणार आहे. या शोभायात्रेत राम-रावण युद्ध झाकी, भगवान नृसिंह अवतार, देशभक्तीपर ऑपरेशन सिंदूर झाकी, भोलेनाथ व साधू-महात्म्यांचे देखावे, अयोध्येतील रामलल्ला मूर्ती तसेच गौमाता प्रतिमा हे प्रमुख आकर्षण राहणार आहेत. विशेष म्हणजे महिलांसाठी स्वतंत्र शौर्य पथकाची स्थापना करण्यात आली असून ७ हजार स्वयंसेवकांचा सहभाग असणार आहे.

### शिवाजीनगरात उभारली संरक्षण भिंत

रामनवमीनिमित्त शहरातील गाडीपुरा ते अशोकनगरपर्यंत दरवर्षी भव्य शोभायात्रा काढण्यात येते. या दरम्यान शोभायात्रेला काही गालबोट लागू नये, यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून शिवाजीनगर येथील प्रार्थनास्थळ ते आयटीआय चौकादरम्यान मुख्य रस्त्यामधील बॅरिकेट्‌चा आधार घेत ३० ते ३५ फुट उंच संरक्षण भिंत उभारण्यात आली आहे. मात्र या भिंतीऐवजी सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी पुढे येत आहे. पोलीस प्रशासनाकडून या पार्श्वभूमीवर आयोजकांची एक बैठक घेण्यात आली आहे. तसेच नागरिकांनी रामनवमी शांततेत व उत्साहात साजरी करावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## साताऱ्याचे एसपी तुषार दोशींचं निलंबन मागे; नीलम गोऱ्हेंनी दिलेला आदेश सभापती राम शिंदेंकडून रद्द

**मुंबई (प्रतिनिधी)–** साताऱ्याचे एसपी तुषार दोशींचं निलंबन मागे घेण्यात आले आहे. नीलम गोऱ्हे यांनी दिलेला निलंबनाचा आदेश सभापती राम शिंदे यांच्याकडून रद्द करण्यात आला आहे.

सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीवरुन भाजप आणि शिवसेनेत जोरदार राडा झाल्याचं पाहायला मिळालं. अधिवेशन काळात विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात शिवसेना नेते तथा मंत्र्यांनी जोरदार भाषण करत साताऱ्याचे एसपी तुषार दोशींवर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर, उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी तुषार दोशींच्या निलंबनाचे निर्देश दिले. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उपसभापतींच्या या निर्देशावर कायदेशीर बाजू समजावत हे निर्देश देण्याच्या अधिकारावर भाष्य केलं होतं. एकीकडे तुषार दोशींच्या निलंबनावर शिवसेना नेते तथा मंत्री ठाम असताना दुसरीकडे उपसभापती नीलम गोऱ्हेंचे आदेश सभापती राम शिंदेंनी रद्द केले आहेत. त्यावरुन, शिवसेना आणि भाजप नेत्यांमध्ये पुन्हा वादावादी होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर सभागृह तहकूब करण्यात आले.

तुषार दोशींच्या निलंबनासंदर्भातील निर्देश आदेशावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सभागृहात काय घोषणा करतात याकडे शिवसेनेचे लक्ष लागले होते. निलंबन मागे घेतल्यास शिवसेनेकडून तीव्र नाराजी नोंदवण्याची शक्यताही वर्तवली जात होती. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत पोलीस चुकीच्या पद्धतीने वागल्याचा आरोप सत्ताधारी शिवसेना मंत्र्यांनी केला होता. मात्र, आता सभापतींनी राम शिंदे यांनी उपसभापती नीलम गोरे यांचे एस.पी. तुषार देशी यांच्या निलंबनाचे दिलेले आदेश कक्षेबाहेर असल्याचं सांगितलं.

## रशियाकडून ६ कोटी बॅरल तेल खरेदी, एप्रिल महिन्यात होणार पुरवठा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आखाती देशातील युद्धस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारताने रशियाकडून तब्बल ६ कोटी बॅरल तेलाची खरेदी केली आहे. एप्रिल महिन्यात या तेलाचा पुरवठा होणार आहे.

अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमध्ये युद्ध सुरू असल्याने होर्मूझच्या सामुद्रधुनीतील जल वाहतूठ ठप्प झाली आहे. त्यामुळे देशाला होणारा तेल पुरवठा आटला आहे. अमेरिकेने रशियन तेल खरेदीसाठी ३० दिवसांची मुभा दिली आहे. एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात ही मुदत संपणार आहे. त्यामुळे भारताने रशियन तेलाची खरेदी वाढविली आहे. मात्र, वाढलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर रशियाने ब्रेंट क्रूडच्या तुलनेत ५ ते १५ डॉलर अधिक आकारण्यास सुरुवात केली आहे. यापूर्वी भारताला सवलतीच्या दरात तेल देण्यात येत होते. केप्लर या तेल बाजार अभ्यासक संस्थेच्या मते चालू महिन्याप्रमाणेच एप्रिलमध्ये रशियन तेल येईल. मात्र, फेब्रुवारीच्या तुलनेत दुप्पटीने रशियन तेल भारतात येईल.

## नांदेड ईदगाहजवळ दुचाकी स्फोटप्रकरणी राज्य अल्पसंख्यांक आयोगाने मागविला अहवाल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या वाजेगाव ते देगलूर नाका भागात असलेल्या ईदगाह मैदान परिसरात एका दुचाकीचा स्फोट होऊन यात दुचाकी चालक ठार झाला होता. ही घटना रमजान ईदच्या दिवशी सकाळी साडेनऊच्या सुमारास वाजेगाव ईदगाहजवळ घडली होती. हे प्रकरण विधानसभेत पोहोचले असतानाच आता राज्य अल्पसंख्याक आयोगाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून त्याचा अहवाल सादर करण्यात यावा, असे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले आहेत. तसेच या प्रकरणात एमआयएमचे सय्यद मोईन, फेरोज लाला, कॉंग्रेसचे अब्दुल सत्तार आदींनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले होते.

दि. २१ मार्च रोजी रमजान ईद होती. या दिवशी वाजेगाव बंधाऱ्याजवळील ईदगाजवळ दुचाकीचा स्फोट झाला. त्यात व्यक्ती गंभीररीत्या भाजून मृत्युमुखी पडला. ईदगाहमध्ये ईदची नमाज अदा करण्यासाठी हजारो मुस्लिम बांधव जमा झाले होते. त्याचवेळी हा स्फोट झाला. या स्फोटाची घटना महाराष्ट्रभर पसरली होती. सोशल मीडिया, टीव्ही चॅनल, युट्यूब, इंस्टाग्राम, फेसबुक मुळे या स्फोटाची माहिती राज्यभरात पोहोचली. घातपात, सुसाईड स्फोट की, आत्महत्या याबाबत चर्चेला उधाण आले होते. दरम्यान, नांदेड पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा प्रशांत शिंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, ग्रामीणचे ओमकांत चिंचोलकर यासोबतच फॉरेन्सिक टीमने ही घटनास्थळी पाहणे केली होती. या सर्व घटनेचा पंचनामा करून तपास सुरू करण्यात आला. याप्रकरणी आता दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) तपास करीत आहे.

या प्रकरणाचे पडसाद विधानसभेतही उमटले. समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी वाजेगाव ईदगाह घटनेची चौकशी करावी, अशी मागणी विधानसभेमध्ये विधानसभा अध्यक्षांकडे केली. तसेच कॉंग्रेस व वंचितच्या नगरसेवकांनी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. बाळासाहेव आंबेडकर यांना भेटून या प्रकरणाचे निवेदन दिले. आता हे प्रकरण राज्य अल्पसंख्यांक आयोगाने या गंभीरपणे घेतले आहे. या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, घटनेतील मृत व्यक्तीची ओळख पटली असून त्यामागील कारण मीमांसा व पार्श्वभूमी तपासण्यात यावी, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व तांत्रिक पुरावांच्या आधारे तपास वेगाने पूर्ण करण्यात यावा, स्फोटाचे नेमके कारण (दहशतवादी कृत्य/अपघाती घटना/ इतर कोणतेही कारण) वैज्ञानिक पद्धतीने (फॉरेन्सिक तपासणीद्वारे) निश्चित करण्यात यावे, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ईदगाह व परिसरात कडक पोलीस बंदोवस्त व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात व सदर प्रकरणाचा सविस्तर अहवाल तात्काळ राज्य अल्पसंख्यांक आयोगाकडे सादर करण्यात यावा, ही घटना अल्पसंख्यांक समाजाच्या सुरक्षिततेशी निगडित असल्याने अत्यंत गांभीर्याने घेऊन त्वरित व निष्पक्ष कारवाई करण्यात यावी, असेही राज्य अल्पसंख्याक आयोगाचे राज्य सदस्य वसीम ख्वाजाभाई वुहान यांनी पत्रात नमूद केले आहे.

## रामनवमीनिमित्त शहरातील वाहतूक मार्गात बदल

### ठरवून दिलेल्या मार्गांचाच चालकांनी अवलंब करावा -पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात व ग्रामीण भागात हिंदू बांधवांच्यावतीने श्री रामनवमी जन्मोत्सवनिमित्त शोभायात्रा काढून उत्सव साजरा करण्यात येणार आहे. सदर शोभायात्रेमध्ये मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय हजर राहण्याची शक्यता आहे, यामुळे वाहतूक खोळंबा होऊ नये, यासाठी वाहतूक मार्गात एका दिवसासाठी बदल करण्यात आला आहे. या ठरवून दिलेल्या मार्गांचाच वाहन चालकांनी अवलंब करावा असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

नांदेड शहरात दि. २६ मार्च रोजी श्री रामनवमी जन्मोत्सवनिमित्त शोभायात्रा अनुषंगाने मोठ्या प्रमाणात मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्याकरिता दि. २६ मार्च रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत खालीलप्रमाणे वाहतुकीच्या नियमनासंबंधाने अधिसूचना काढण्यात आली आहे.

**वाहतुकीकरीता बंद असलेले मार्ग :** बकी चौक ते जुना मोंढा, देना बँक महावीर चौक, तरोडकर मार्केट वजिराबाद चौक, कलामंदीर -शिवाजीनगर, आयटीआय चौक ते श्रीनगर-वर्कशॉप कॉर्नरपर्यंत येण्या जाण्यासाठी वाहतूक पूर्णपणे बंद राहील. सिडको-हडको-नवीनपूलमार्गे जुना मोंढाकडे येणारी वाहतुक येण्या-जाण्यासाठी वाहतुक पुर्णपणे बंद राहील. पावडेवाडी नाका ते शासकीय विश्रामगृहकडे जाणारा रस्ता वाहतुकीस ये-जा करण्यासाठी पुर्णपणे बंद राहील. रवीनगर कौठा गोवर्धन घाट पुलावरुन वजिराबाद चौकाकडे येणारी वाहतुक बंद राहील. राज कॉर्नर ते आयटीआयकडे येण्यासाठी वर्कशॉप टी पॉईट श्रीनगर ते आयटीआयपर्यंत डावी बाजु वाहतूकीसाठी बंद राहील.

**वाहतुकीकरीता पर्यायी मार्ग :** बर्की चौककडून जुना मोंढ्याकडे येणारी वाहतुक हबीब टॉकीजपासून महमद अली रोड मार्गे, केळी मार्केट -गिटी क्रेशर रोडचा वापर करावा. वजिराबाद चौककडून श्रीनगर वर्कशॉपकडे जाणारी वाहतुक तसेच सिडको-हडकोकडून शहरात येणारी वाहतुक ही गोवर्धनघाट पुल-तिरंगा चौक पोलीस मुख्यालय मार्गे पक्की चाळ पोलीस चौकी-खडकपुरा- लालवाडी- अंडरब्रिज मार्ग शिवाजीनगर- पिवळी गिरणी, गणेशनगर- वाय पॉईट, पावडेवाडी नाका मार्गे मोर चौक, छत्रपती चौक ते कॅनॉल रोड बायपास अशी वाहतुक करण्यात यावी. राज कॉर्नर ते जुना मोंढ्याकडे जाणारी वाहतुक ही राज कॉर्नर- शिव मंदिरमार्गे पिरबुऱ्हाण चौक, आनंदनगर चौक-नाईक चौक अण्णाभाऊ साठे चौक- यात्रीनिवास पोलीस चौकी-अबलचलनगर ये-जा करता मार्गाचा वापर करावा, पावडेवाडी नाका ते शासकिय विश्रामगृहकडे जाणारी वाहतुक ही मोर चौक, छत्रपती चौक मार्ग जातील.

## ३१ मार्चला बँका रात्री उशिरापर्यंत सुरु राहणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर शासनाचा निधी अखर्चित राहू नये, यासाठी ३१ मार्च २०२६ अखेर प्राप्त होणारी देयके पारित करून त्याच दिवशी आहरण व वितरण अधिकाऱ्यांना ई-कुबेर व धनादेशाद्वारे प्रदान करणे आवश्यक आहे.


यासाठी महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम ४०९ नुसार जिल्हाधिकाऱ्यांना कोषागारातील व्यवहारासाठी सुट्टीच्या दिवशीही बँका उघड्या ठेवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने ३१ मार्च २०२६ रोजी शासनाचे कोषागाराशी संबंधित सर्व आर्थिक व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी भारतीय स्टेट बँक तसेच शासनाचे व्यवहार हाताळणाऱ्या जिल्हा व तालुका स्तरावरील इतर बँकांच्या शाखा रात्री उशिरापर्यंत कार्यरत ठेवाव्यात, असे आदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमित केले आहेत.

## मोटारसायकल-ट्रॅव्हल्सचा अपघात, एक ठार तर एक जखमी

**नरसी (प्रतिनिधी)–** नरसी ते मुखेड मार्गावर बेंद्री-खंडगावजवळ दि. २५ मार्च रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास मोटारसायकल आणि ट्रॅव्हल्स यांचा भीषण अपघात झाला. या घटनेत एक जण ठार तर एक जखमी झाल्याची घटना घडली आहे.



बेंद्री खंडगाव परिसरातील बी. फार्मसी कॉलेज रोडवर नरसीहून मुखेडकडे जाणाऱ्या मोटारसायकलची नरसीच्या दिशेने येणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सशी जोरदार धडक झाली. या अपघातात विकास नारायण गायकांबळे (३२) देगाव ता. देगलूर यांचा जागीच मृत्यू झाला. तर ओमकार नागोराव कोनापुरे (५०) हे गंभीर जखमी झाले आहेत.









जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# रामराज्याची संकल्पना आणि आजच्या काळातील गरज

भारतीय संस्कृतीचा इतिहास पाहिला, तर तो केवळ परंपरांचा नाही तर मूल्यांचा आणि आदर्शांचा प्रवास आहे. या भूमीवर अनेक युगपुरुषांनी अवतार घेऊन समाजाला दिशा दिली. त्यामध्ये प्रभू श्रीराम हे एक तेजस्वी आणि अनुकरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून उभे राहतात. आजच्या बदलत्या आणि अस्थिर सामाजिक परिस्थितीत रामराज्य ही संकल्पना पुन्हा चर्चेत येणे, ही केवळ धार्मिक भावना नसून एक सामाजिक आणि नैतिक गरज बनली आहे. रामराज्य म्हणजे केवळ एक पौराणिक कल्पना नव्हे, तर सुशासनाचे आदर्श मॉडेल आहे. त्या काळात समाजात समता, न्याय, सुरक्षितता आणि समाधान यांचा संगम होता, असे वर्णन आढळते. प्रत्येक व्यक्तीला अन्न, निवारा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला होता. भेदभाव, अन्याय किंवा भ्रष्टाचार यांना स्थान नव्हते. आजच्या काळात हीच मूल्ये सर्वाधिक दुर्लक्षित झालेली दिसतात. त्यामुळे रामराज्य ही संकल्पना केवळ भूतकाळात रमणारी नसून वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी मार्गदर्शक ठरते. मात्र, केवळ सण साजरे करून किंवा घोषणाबाजी करून रामराज्य प्राप्त होणार नाही. त्यासाठी श्रीरामांच्या जीवनातील तत्त्वांचे आचरण करणे आवश्यक आहे. श्रीराम हे केवळ पराक्रमी योद्धा नव्हते, तर ते कर्तव्यनिष्ठ राजा, आदर्श पुत्र, प्रामाणिक मित्र आणि सहानुभूतीशील नेता होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संयम, धैर्य, करुणा आणि न्यायबुद्धी यांचा सुंदर संगम दिसतो. आजच्या युवकांनी आणि राज्यकर्त्यांनी हे गुण आत्मसात करण्याची गरज आहे. रामराज्यात सामाजिक एकात्मता, नैतिकता आणि जबाबदारी या मूल्यांना त्यांनी प्राधान्य दिले जाते. आजच्या काळात, जिथे व्यक्तिवाद आणि स्वार्थी वृत्ती वाढत चालली आहे, तिथे त्यांच्या विचारांची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. समाजातील वाढती असहिष्णुता, भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि नैतिक अधःपतन या समस्या पाहता, केवळ कायदे किंवा यंत्रणा पुरेशी ठरत नाहीत. त्यासाठी समाजमन बदलणे आवश्यक आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीने स्वतःपासून बदलाची सुरुवात केली, तरच व्यापक परिवर्तन शक्य आहे. हा दृष्टिकोन रामराज्याच्या संकल्पनेशी अगदी सुसंगत आहे, कारण रामराज्याची पायाभरणी ही व्यक्तीच्या नैतिकतेवरच आधारित होती. आजच्या युवकांपुढे अनेक आव्हाने आहेत जसे स्पर्धा, ताणतणाव, दिशाहीनता. अशा वेळी श्रीरामांचा आदर्श आणि त्यांचे मार्गदर्शन हे युवकांना योग्य दिशा देऊ शकते. शारीरिक आणि मानसिक सक्षमता, समाजाप्रती जबाबदारी आणि नैतिक मूल्यांचे पालन या बाबींची जाणीव निर्माण करणे, ही काळाची गरज आहे. केवळ यश मिळविणे नाही, तर योग्य मार्गाने यश मिळविणे हे अधिक महत्त्वाचे आहे, हे या दोन्ही आदर्शांमधून स्पष्ट होते. रामनवमीसारखे सण साजरे करताना, त्यामागील संदेश समजून घेणे अधिक आवश्यक आहे. हा सण केवळ उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपण आपल्या जीवनात कितपत आदर्शांचे पालन करतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. समाज अधिक सुसंस्कृत, सुरक्षित आणि न्याय्य बनवायचा असेल, तर श्रीरामांचे आदर्श आणि आजची परिस्थिती यांचा संगम घडविणे अपरिहार्य आहे. शेवटी, रामराज्य ही केवळ एक ऐतिहासिक किंवा धार्मिक संकल्पना नसून, ती एक जिवंत प्रेरणा आहे. ती साकारण्यासाठी प्रत्येकाने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून प्रामाणिकपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. आजच्या अस्थिर काळात, या मूल्यांची पुनर्स्थापना करणे, हेच खऱ्या अर्थाने रामराज्याकडे वाटचाल करण्याचे पहिले पाऊल ठरेल.

# ‘पुरुषोत्तम श्री रामचंद्र आणि वर्तमान’

माणसाचा देव करणे हे देवाचा माणूस करण्यापेक्षा खूप सोपं आहे! एखाद्या महापुरुषाचा देव केला की; पुन्हा आपलं जे आहे ते करायला माणूस मोकळा. देवावर सोपवून आपल्याला हवा तसा देव वळवायला माणूस सोकावला आहे. मुळात देवाची निर्मितीच माणसा-पासून झाली. देव म्हणजे दिव्यता! देव म्हणजे निखळ प्रेम! देव म्हणजे मुंगी आणि राव यात भेद न करणारा असामान्य महामानव! देव म्हणजे जगाला देणारा मग ते कृतीशील ज्ञान असो की एखादा महान विचार! देव म्हणजे केवळ एखाद्या जात, धर्म, लिंग किंवा समूहापुरता मर्यादित माणूस नाही. देव म्हणजे माणसा-माणसातील भेद संपवून अखंड मानवतेचे कल्याण करणारा महान कृतीशील विचारवंत! एवढं लिहिण्याचे कारण म्हणजे आज श्री राम नवमी, म्हणजेच पुरुषोत्तम श्रीरामचंद्र यांचा जन्मदिवस! आज भारतभर रामनवमीचा सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा होत असून ढोल-ताशांच्या गजरात पुरुषोत्तम श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमेच्या मिरवणुका निघत आहेत. भजन-कीर्तन मोठ्या उत्साहात साजरे केले जात आहे. निश्चितच ही आनंदाची आणि गौरवाची बाब आहे!

सज्जनहो, आज एकीकडे सर्वच महा-मानवांच्या जयंती-मयंतीला उत्सवाचे स्वरूप आले असताना दुसरीकडे मात्र या गोंगाटात, ढोल-ताशांच्या आवाजात त्या महापुरुषाचा आचार-विचार विरून तर जात नाही ना? असा प्रश्न पडतो. माणूस मोठा विस्मयकारी प्राणी आहे. तो कधी कुणाला देव करेल आणि कधी कुणाची पायरी करेल याचा नेम नाही! अलीकडे समाजात बेगडी धार्मिक अस्मिता आणि तदनुषंगाने कट्टरता बळावत चालली आहे आणि सार्वभौम, लोकशाही, धर्मनिरपेक्ष देशासाठी निश्चितच ही स्वागतार्ह बाब नाही. त्यात लोकशाहीच्या बळावर उभी असलेली संवैधानिक सरकारे अशा बाबींना खतपाणी घालत असतील तर देशाची अखंडता आणि देशप्रेम कसे वृद्धिंगत होणार? असे एक ना अनेक प्रश्न समोर उभे आहेत.

आज पुरुषोत्तम श्रीरामचंद्र महाराज यांची जयंती आहे. रामायण या महाकाव्याचा नायक श्रीरामचंद्र असून



आज श्री रामाची जयंती साजरी करताना आपल्याला काही महत्वपूर्ण मुद्द्यावर चिंतन करणे क्रमप्राप्त आहे. जगात ३०० पेक्षा जास्त रामायण असल्याचे संशोधक सांगताहेत. ऋग्वेदात रामाचा, एक प्रतापी और धर्मात्मा राजा तर सितेचा उल्लेख कृषी देवी असा आढळतो. जातक कथेत दशरथ आणि रामाचा उल्लेख आढळतो. नेपाळ, इंडोनेशिया, जावा, बर्मा, थायलंड, इंडोचायना इत्यादी देशात रामायण वेगवेगळ्या नावाने महाकाव्य म्हणून वाचले जाते. याचाच अर्थ रामायण आजही एक संशोधनाचा विषय आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. अलीकडे केवळ मीडियावर वाचनारांची आणि पुढे ढकलणारांची संख्या प्रचंड वाढली आहे. कोण काय लिहितंय? संदर्भ काय? त्याचे साधक-बाधक काय परिणाम होतील? त्यात सत्यता किती आहे? हे न पाहता केवळ फॉरवर्ड करणे सुरु आहे. कधी कधी एखादी बाब पुढे पाठवल्याने जर सामाजिक सलोखा, ऐक्य धोक्यात येत असेल तर अशी पोस्ट किंवा लेखन पुढे ढकलायचे टाळणे सोयीस्कर असते, मात्र तसे होत नाही. आज अयोध्येचा राजा श्री रामचंद्र महाराज यांची जयंती साजरी करताना श्री रामाचे गुण आणि माणूस म्हणून काही दोष याचा साधक बाधक विचार होताना वैचारिक चिंतन-मंथन झालेच पाहिजे.

रामनवमी निमित्ताने श्रीरामाचे कोणते सद्गुण आपल्या अंगी उतरवायला पाहिजे यावर विचार व्हावा. श्रीराम चंद्र एक राजपुत्र आणि एक राजा म्हणून कसे होते? श्रीरामाकडे धैर्य आणि सहनशीलता होती. आपल्या सावत्र आईच्या इच्छेखातर वनवासाला जाणारा सुपुत्र श्री राम! याशिवाय त्यांच्याकडे समता, ममता असून ते राग-द्वेष मुक्त आहेत हे संत तुलसीदासजींच्या तुलसी ममता राम सों, समता सब संसार। राग न रोष न दोष दुख, दास भए भव पार।।

या दोह्यावरून लक्षात येते. याशिवाय सत्य, न्याय, दया, करुणा, गुरुभक्ती, त्याग, आत्मसंयम, सहिष्णुता, सदाचार, आत्मसमर्पण इत्यादी सद्गुण राजा श्रीरामचंद्र यांच्याकडे आढळून येतात. असे सद्गुण श्रीरामचंद्र यांच्याकडे असताना त्यांच्या दोषावरही बोलले जाते. जसे की; शंबूक आणि वाली यांचा वध आणि गरोदर पत्नी सीतेला कसलीही शहानिशा न करता लोकांच्या म्हणण्यावरून वनवासाला पाठवणे इत्यादी बाबी रामाच्या बाबतीत चर्चिल्या जातात. माणूस हा चुकीचा पुतळा असून एक राजपुत्र, राजा आणि माणूस या नात्याने त्यांच्याकडून हे घडणे साहजिक आहे. त्यासाठी माणसाने एखाद्या व्यक्तीला देव करून टाकू नये. त्याचबरोबरीने धर्मग्रंथांच्या केवळ पोथ्या न करता त्याची साधक बाधक चिकित्सा करून योग्य नसलेल्या, कालबाह्य झालेल्या बाबी बाजूला करणे म्हणजे खरा धर्म! आज विविध अभिनिवेश तीक्ष्ण होत असताना माणसांना आपले दोष ऐकून घ्यायची क्षमता राहिली नाही. मी म्हणेन तीच पूर्व दिशा. मला जे समजते तेच अंतिम सत्य ही धारणा माणसाला अधोगतीला नेत आहे. त्यासाठी माणसाने आपली सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवून योग्य-अयोग्य यातील अंतर ओळखून राहिले पाहिजे.

आज भारत देश लोकशाही राज्याच्या शंभरीकडे वाटचाल करताना रामराज्याची संकल्पना काय होती (?) आणि खऱ्या अर्थाने ती अमलात आणण्याची गरज आहे असे वाटते. अयोध्येत श्रीरामाचे भव्यदिव्य मंदिर झाले ही आनंदाची बाब असली तरी रामाचे काम एवढ्यावर थांबवून कसे चालेल? त्यासाठी आपल्या सर्वांना राम राज्यासाठी परिश्रम घ्यावे लागतील. गुणांचा उदोउदो होताना दोष आ-ळखावे लागतील. रामराज्य या अनुषंगाने महात्मा गांधी, मी रामराज्याचा अर्थ हिंदू राज्य असा समजत नाही. राम राज्य हे देवाचे राज्य आहे, असे मी मानतो. माझ्यासाठी राम आणि रहीम हे दोन्हीही एक आणि सारखेच आहेत; सत्य आणि सद्गुणांव्यतिरिक्त मी दुसऱ्या कुठल्याही देव-ाला मानत नाही. माझ्या कल्पनेतील राम या पृथ्वीतलावर खरोखरच होऊन गेला का, हे मला माहिती नाही. परंतु, रामायण हे खऱ्या लोकशाहीचे असे उदाहरण आहे, जिथे लांबलचक आणि महागड्या प्रक्रियांना सामोरे न जाता सुद्धा समाजातील शेवटच्या नागरिकाला न्याय मिळू शकतो. रामराज्य म्हणजे, आपल्याला आपले, आपले वाटणारे राज्य म्हणजेच नागरिकांच्या नैतिकतेवर आधारलेले राज्य. धर्म, शांतता, सौहार्द आणि लहान-मोठे, उच्च-नीच, सर्व प्राणिमात्र आणि पृथ्वीच्यासुद्धा आनंदाचा विचार करून वैश्विक जाणिवेवर आधारलेले राज्य असे लिहून रामराज्य ही संकल्पना स्पष्ट करतात. याशिवाय मातृपितृ भक्त, बंधू प्रेम इत्यादी महत्वपूर्ण गोष्टी रामायणात आदर्श आहेत.

सज्जनहो, आज खरच रामराज्याची आवश्यकता आहे. रामाच्या कर्तृत्व आणि वर्तनाचे अवलंबन आपल्या जीवनात होण्याची नितांत गरज आहे. एक पत्नी, एक वचनी, बंधू प्रेम सारखे वैश्विक गुण रामाकडून घेण्याचे दिवस आले आहेत. आज माणूस आत्मकेंद्री होत असताना जयंती आणि सणाचे देखावे करून आपला दोष सोडायला तयार नसेल तर मग आपला आदर्श राजा श्रीराम कसा असू शकेल? तेंव्हा चला, रामाचे सद्गुण अंगी उतरवून हळूहळू दोष सोडून देऊया! असे झाल्यास खऱ्या अर्थाने राजा श्रीरामचंद्र यांची जयंती साजरी होईल अन्यथा मीडियासाठी केवळ देखावा! राजा रामचंद्र महाराज की जय!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
सोनपेठ, जि. परभणी

# सुख-शांती निर्माणासाठी प्रभू रामचंद्राचे आदर्श अंगीकारण्याची आवश्यकता



चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्माच्या नवीन वर्षाची सुरुवात. या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते. महाराष्ट्रात नवीन वर्ष गुढीपाडवा म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पद्धतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केला जातो. याच महिन्यात चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच महिन्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला. म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरा करण्यात येतो.

रामनवमीला भजन, कीर्तन, पालखी व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते. आज जगात ज्या-ज्या ठिकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे. भारतात बहुसंख्य हिंदू असताना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती, सन्मान, सभ्यता, संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने राहतात. त्यामुळे संपूर्ण हिंदू धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता आणि ते साध्य झाले. त्यामुळे आज आपल्याला अयोध्येत भव्य राममंदिर दिसून येते.

आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयम दिसून येतो आणि तोही फक्त प्रभूरामचंद्रांच्या आशीर्वादानेच. यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहिली पसंती भारत असल्याचे दिसून येते. यामागे फक्त प्रभू राचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल व आहे. प्रभूरामचंद्राचा आशीर्वाद भारतीयांना आहे. त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील. कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्त्व विभागाने जाहीर केले आहे. श्री रामाचा जप आपण जन्मापासून तर शेवटपर्यंत करीत असतो. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दुःख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात, आकाश-पाताळ, पूर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण, निसर्ग, वन्यप्राणी, मानव-जिवजंतू यांच्या मनामनांत वावरत असतो. त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहिली पसंती भारत असल्याचे दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा, साधुसंतांचा व थोर महात्म्यांचा वास आहे. त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात. आज जगात भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभू रामचंद्रांच्या आदर्शामुळे. त्यामुळे प्रभूरामचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ज्ञात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य झाले आहे की, त्यांची संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठिकाण बनलेले आहे. त्याचप्रमाणे सात आजुब्यातून राममंदिर प्रथम क्रमांकावर आहे.त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भूमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदू संस्कृती जोपासण्याकरिता देशातील प्रत्येक हिंदूंनी नवनिर्माण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरण स्पर्श केलेच पाहिजे.

भारतातील प्रत्येक धर्माच्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की, श्रीराम सर्वांचे आहेत व राहतील. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला, वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला. ऋषी-मुनी, साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले. रावनासारख्या असूर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापना झाली व सत्ययुग प्रस्थापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभूराचंद्रांची धुंद गुंजताना दिसते. तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार झाली आहे हे हिंदू धर्माचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.

आज अयोध्येतील राम मंदिरामुळे मन में राम, तन मे राम, घर-घर मे राम या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे. आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो. या मागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे.श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भार-तासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभू श्रीरामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम म्हटल्या जाते. प्रभू राम सत्यतेचे प्रतीक आहे. त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे. कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी वृत्तीचे असल्या-मुळे भ्रष्टाचाराने लिप्त आहेत व मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती डांबून ठेवली आहे. या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वतःची सेवा करण्यात मग्न (गुंग) असतात. मुहंमे राम बगल में छुरी अशा प्रकारची असुरी भावना त्यांच्यात दिसून येते.कारण गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पिऊन आजचा ९५ टक्के राजकीय पुढारी रक्तबीज राक्षसाची भूमिका बजावताना दिसून येतो.त्यामुळेच देशात भ्रष्टाचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक आजी-माजी, आमदार, खासदार, मंत्री व अनेक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे. यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भूकमारी, महागडे शिक्षण, शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्यविषयक समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांनी जन्म घेतला आहे.

रामनवमी निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की, रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गाने कमविलेली व भ्रष्टाचार रूपाने कमविलेल्या संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिज-ोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावा यातच खरे प्रभु श्रीराम यांचे दर्शन दिसून येईल. त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मूलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी अंगीकारला पाहिजे. राजकीय पुढाऱ्यांनी गरीब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाज-कार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल. जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही. याकरिता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्थाने दिसून येईल.

आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्या-मुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्माण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे देशाच्या १४० कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते. या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोर ठेवून राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे. तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल. रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वाढत्या प्रदूषणावर व बदलत्या हवामानावर आवर घालण्यासाठी वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात, फळात प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शन अवश्य होईल. कारण निसर्गाच्या सान्निध्यातच प्रभू रामचंद्र आहेत. जय श्रीराम!

**-रमेश लांजेवार**
नांगपूर
मो. ९९२१६९०७७९

# सम्राट अशोक : धर्म, न्याय आणि मानवतेचा दीपस्तंभ

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि शासकांनी आपापल्या कार्याची अमिट छाप सोडली आहे; परंतु ज्यांनी केवळ राज्यकारभारात यश मिळवले नाही, तर मानवी मूल्यांचा, नैतिकतेचा आणि शांततेचा मार्ग स्वीकारून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श निर्माण केला, अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये सम्राट अशोक यांचे स्थान सर्वोच्च मानले जाते. सम्राट अशोक यांची जयंती ही केवळ एका राजाची आठवण नसून, ती मानवी जीवनातील परिवर्तन, आत्मपरीक्षण आणि धर्माधिष्ठित शासनव्यवस्थेची प्रेरणा देणारी एक महान घटना आहे.

सम्राट अशोक हे मौर्य साम्राज्याचे तिसरे सम्राट होते. त्यांचा जन्म इ.स. पूर्व ३०४ च्या सुमारास झाला असे मानले जाते. त्यांचे वडील सम्राट बिंदुसार आणि आजोबा चंद्रगुप्त मौर्य होते. चंद्रगुप्त मौर्य यांनी स्थापन केलेल्या मौर्य साम्राज्याचा विस्तार आणि सुदृढीकरण करण्याचे महान कार्य अशोकांनी केले. बालपणा-पासूनच अशोक हे बुद्धिमान, पराक्रमी आणि धाडसी होते. त्यांना युद्धकलेत प्रावीण्य होते आणि राज्यकारभाराची उत्तम समज होती. त्यामुळेच त्यांच्या वडिलांनी त्यांना विविध प्रांतांचे राज्यपाल म्हणून नेमले होते. तक्षशीला आणि उज्जैनसारख्या महत्त्वाच्या प्रांतांचे प्रशासन त्यांनी कुशलतेने सांभाळले.

राजसिंहासनावर आरूढ झाल्या-नंतर सम्राट अशोकांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी



अनेक मोहिमा केल्या. त्यातील सर्वात महत्त्वाची आणि ऐतिहासिकदृष्ट्या निर्णायक ठरलेली मोहीम म्हणजे कलिंग युद्ध. इ. स. पूर्व २६१ मध्ये झालेल्या या युद्धात अशोकांनी विजय मिळवला; परंतु या विजयाची किंमत अत्यंत भीषण होती. हजारो सैनिक आणि निरपराध नागरिक मारले गेले, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, आणि संपूर्ण प्रदेशात हाहाकार माजला. या युद्धानंतर अशोकांच्या मनावर खोल परिणाम झाला. रणांगणावर पडलेल्या मृतदेहांचे दृश्य, विधवा झालेल्या स्त्रियांचा आक्रोश आणि अनाथ मुलांचे दुःख पाहून अशोकांच्या अंतःकरणात प्रचंड वेदना निर्माण झाली.

याच क्षणापासून अशोकांच्या जीवनात एक महान परिवर्तन घडले. त्यांनी युद्ध आणि हिंसेचा मार्ग सोडून धर्म, अहिंसा आणि करुणेचा मार्ग स्वीकारण्याचा निश्चय केला. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि ‘धम्म’ या संकल्पनेचा प्रसार सुरू केला. अशोकांचा ‘धम्म’ हा केवळ धार्मिक आचार-विचारांपुरता मर्यादित नव्हता, तर तो नैतिक जीवनपद्धतीचा मार्ग होता. सत्य, अहिंसा, करुणा, दया, सहिष्णुता, प्रामाणिकपणा आणि सर्व जीवांप्रती आदर या मूल्यांचा त्यांनी प्रचार केला.

सम्राट अशोकांनी आपल्या धम्माचा प्रसार करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांनी आपल्या राज्यभर शिलालेख आणि स्तंभ उभारले, ज्यांवर धम्माचे उपदेश कोरलेले होते. हे शिलालेख आजही भारताच्या विविध भागांत आढळतात आणि अशोकांच्या विचारांचा जिवंत पुरावा म्हणून उभे आहेत. त्यांनी ‘धम्म महामात्र’ या अधिकाऱ्यांची नेमणूक केली, ज्यांचे काम लोकांमध्ये नैतिकता आणि सदाचार यांचा प्रसार करणे होते. अशोकांनी आपल्या प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. त्यांनी रस्त्यांच्या कडेला झाडे लावली, विहिरी आणि धर्मशाळा बांधल्या, प्राण्यांसाठी आणि माणसांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली.

सम्राट अशोकांची शासनपद्धती अत्यंत प्रगत आणि लोकाभिमुख होती. त्यांनी धर्मनिरपेक्षतेचा आदर्श ठेवला आणि सर्व धर्मांना समान आदर दिला. त्यांनी कोणत्याही एका धर्माला प्राधान्य न देता सर्वांच्या श्रद्धांचा सन्मान केला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार हा केवळ सत्ता चालवण्याचा मार्ग नव्हता, तर तो जनतेच्या कल्याणासाठी असलेली एक जबाबदारी होती. त्यांनी न्यायव्यवस्था सुधारली आणि लोकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी विशेष यंत्रणा निर्माण केली.

अशोकांनी बौद्ध धर्माचा प्रसार केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही, तर त्यांनी त्याचा प्रसार जगभर केला. त्यांनी आपल्या पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले, जिथे त्यांनी बौद्ध धर्माचा प्रचार केला. तसेच त्यांनी इतर देशांमध्येही धम्मदूत पाठवले. यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार आशिया खंडातील अनेक देशांमध्ये झाला. अशोकांच्या या प्रयत्नांमुळे भारताला ‘शांततेचा संदेश देणारा देश’ म्हणून ओळख मिळाली.

सम्राट अशोकांच्या कार्याचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो आजही जाणवतो. भारतीय राष्ट्रध्वजावरील अशोकचक्र हे त्यांच्या विचारांचे प्रतीक आहे. हे चक्र सत्य, न्याय आणि प्रगतीचा मार्ग दर्शवते. तसेच भारताच्या राज्यचिन्हात असलेले सिंहस्तंभ हेही अशोकांच्या काळातील वारसा आहे. यावरून अशोकांच्या विचारांचा आणि कार्याचा भारतीय राष्ट्रजीवनावर किती खोल प्रभाव आहे, हे स्पष्ट होते.

आजच्या काळात, जेव्हा जगात हिंसा, द्वेष आणि असहिष्णुता वाढत आहे, तेव्हा सम्राट अशोकांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या जीवनातून आपल्याला हे शिकायला मिळते की, खरा विजय हा शस्त्रांच्या जोरावर मिळत नाही, तर तो मन जिंकण्याने मिळतो. अशोकांनी दाखवून दिले की, एक शासक केवळ पराक्रमी असणे पुरेसे नाही, तर तो संवेदनशील आणि नैतिकदृष्ट्या सजग असणेही आवश्यक आहे.

सम्राट अशोकांची जयंती ही केवळ ऐतिहासिक स्मरणरंजनाचा दिवस नसून, ती आत्मपरीक्षणाची आणि मूल्यांचे पुनरुज्जीवन करण्याची संधी आहे. त्यांच्या विचारांचा अंगिकार करून आपण समाजात शांतता, सौहार्द आणि न्याय प्रस्थापित करू शकतो. त्यांच्या धम्माच्या मार्गावर चालल्यास मानवजातीसाठी एक उज्ज्वल भविष्य घडवणे शक्य आहे.

अशा या महान सम्राटाला त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे स्मरण ठेवणे आणि त्यांची अंमलबजावणी आपल्या जीवनात करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपण एक सुसंस्कृत, समतामूलक आणि शांततापूर्ण समाज निर्माण करण्याचा संकल्प करूया.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# स्कूल ऑफ स्कॉलर्स शाळा विज्ञाननिष्ठ व मूल्याधिष्ठित शिक्षणाचे प्रतीक –महापौर कविता मुळे

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्वामी विवेकानंद स्कूल ऑफ स्कॉलर्स ही शाळा विद्यार्थ्यांना बालपणापासून शास्त्रज्ञ होण्याचे, त्यांच्यात जिज्ञासा निर्माण करणारी व भावी शास्त्रज्ञ घडविणारी उत्तम अशी शाळा आहे. अशा शाळेत मी सुद्धा ॲडमिशन घेतले असते, असे प्रतिपादन महापौर कविता मुळे यांनी केले.



पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, शाळा विज्ञाननिष्ठ व मूल्याधिष्ठित शिक्षणाचे मूर्तिमंत प्रतीक असून, सर्वप्रथम पाहुण्यांच्या हस्ते रासायनिक प्रक्रिया कशी होते याचे प्रात्यक्षिक करून कार्यक्रमाची सुरुवात केली हे अतिशय महत्त्वाचे वाटले. या शाळेतून विज्ञाननिष्ठ आणि स्वकर्तृत्व निर्माण करणारे विद्यार्थी घडतील याची मला खात्री आहे. मीही शिक्षिका असून, या शाळेच्या मुख्याध्यापिका शितल होकर्णे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांवर घेतलेली मेहनत अभिनंदनीय असल्याचे प्रतिपादन नांदेडच्या महापौर कविता मुळे यांनी केले.

स्वामी विवेकानंद स्कूल ऑफ स्कॉलर्स शाळेच्या फंकी फियेस्टा या विज्ञान, भाषा, गणित, सामाजिक ज्ञान आणि शिक्षणाद्वारे गंमत-जंमत अशा सर्वंकश कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी केले. यावेळी व्यासपीठावर माजी महापौर शैलजा स्वामी, स्थायी समिती माजी सभापती किशोर स्वामी, संतोष मुळे, ज्येष्ठ छायाचित्रकार विजय होकर्णे, शिक्षण विस्तार अधिकारी बालासाहेब कच्छवे, शाळेचे सचिव भारत होकर्णे, शाळेच्या अध्यक्षा तथा मुख्याध्यापिका शीतल पांडे-होकर्णे यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या शैक्षणिक वाटचालीवर आधारित एपिस्टीम या पुस्तिकेचेही मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तत्पूर्वी शाळेचे सचिव भारत होकर्णे यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या मागील अठरा वर्षापासूनच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा सादर केला.

यावेळी माजी महापौर सौ. शैलजा स्वामी यांनी स्वामी विवेकानंद स्कूल ऑफ स्कॉलर्स ही शाळा सातत्याने विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहे. याआधीही मी या शाळेच्या विज्ञान प्रदर्शनाला भेट दिली आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका शीतल पांडे-होकर्णे या ध्येयनिष्ठ असून, आपला प्रत्येक विद्यार्थी कृतिशील आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असणारा असावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. चला शिक्षण आनंदी बनऊया! ही त्यांची टॅग लाईन बरेच काही सांगून जाते असे सांगून त्यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे तर शिक्षण विस्तार अधिकारी बालासाहेब कच्छवे यांनी शाळेच्या विज्ञान आणि गंमत या अभिनव उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना समजेल आणि कृतीतून शिक्षण हा उपक्रम अत्यंत अभिनव असल्याचे प्रतिपादन केले.

मुलांचा मन, मेंदू व मनगट घडविणारी शाळा असल्याचे सांगून शाळेच्या वाटचालीला शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या विविध प्रयोगाला मान्यवरानी भेट देऊन त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार शाळेच्या ॲडमिन कविता गडप्पा यांनी मानले.

# वृत्तपत्र विक्रेत्यांनी घेतला निसर्गाच्या सान्निध्याचा आनंद; उत्साहात पार पडली निसर्ग सहल

**नांदेड (प्रतिनिधी)–** वर्षभर ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता घराघरांत वृत्तपत्र पोहोचवणाऱ्या माहिती दूतांनी अर्थात वृत्तपत्र विक्रेत्यांनी आपल्या परिवारासह दैनंदिन कामाच्या व्यापातून वेळ काढून निसर्गाच्या सान्निध्यात एक दिवस आनंदाने घालवला. निसर्ग सहलीचे हे २ रे वर्षे होते. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्या संकल्पनेतून नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली वार्षिक निसर्ग सहल सीताखंडी येथील आनंदधाम व आनंदवन येथे मोठ्या उत्साहात पार पडली.



वृत्तपत्र विक्रेत्यांचे जीवन अत्यंत कष्टाचे असते. पहाटे लवकर उठून कामाला सुरुवात केल्यामुळे त्यांना कुटुंबासोबत किंवा वैयक्तिक छंदांसाठी वेळ मिळणे कठीण होते. हाच मानसिक ताण हलका व्हावा आणि सर्व विक्रेता बांधवांमध्ये स्नेह वाढावा तसेच सोबत एक दिवस आनंदासाठी या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

सहलीच्या ठिकाणी विक्रेत्यांनी निसर्गाचा आनंद लुटला. जंगलातून पायी जंगल सफारी केली. तसेच महिला, पुरुष व लहान मुले यांनी लिंबू-चमचाचा खेळ खेळला. गाण्याच्या भेंड्या, बोध कथा, मनोगत अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सर्वांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. महिला सदस्यांनी यावेळी बालपण आठवल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. बालाजी कोम्पलवार यांनी अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. राज्य संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांनी संघटनेच्या आजपर्यंत केलेल्या कामासह वेगवेगळ्या विषयांवर मत मांडले.

ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते सरदारसिंह चव्हाण, तामशाचे देवबा डोरले, बालाजी चंदेल, अनुप ठाकूर, बालाजी सुताडे, गजानन पवार, दीपक तिडके, विठ्ठल फडेवार, शंकर वंगलवार यांनीही मनोगत व्यक्त केले. निसर्गाच्या सान्निध्यात गोरे यांनी तिथेच तयार केलेल्या चवदार भोजनाचा आनंद घेतला.

याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत घाटोळ, उपाध्यक्ष सतीश कदम, सहसचिव भागवत गायकवाडांसह मोठ्या संख्येने वृत्तपत्र विक्रेते बांधव उपस्थित होते. अशा उपक्रमांमुळे कामाचा थकवा दूर होऊन पुन्हा जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळते, अशी भावना यावेळी उपस्थित विक्रेत्यांनी व्यक्त केली. संध्याकाळी अंदाजे सात वाजता अत्यंत आनंदी वातावरणात या सहलीचा परतीचा प्रवास सुरू झाला. संदीप कटकमवार यांनी निसर्ग सहलीला सहकार्य केलेल्या व सहभागी झालेल्या सर्व सदस्यांचे अभिनंदन करून आभार मानले.

# नवज्योत फाऊंडेशनच्या संस्कार शिबिरात ८०० विद्यार्थी सहभागी होणार

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील नवज्योत फाऊंडेशनचे २० वे संस्कार शिबीर २७ ते २९ मार्च दरम्यान कुसुम सभागृह येथे आयोजित करण्यात आले असून, या शिबिरात ८०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केल्याची माहिती नवज्योत फाऊंडेशनचे संस्थापक चेअरमन नौनिहालसिंघ जहागिरदार यांनी दिली आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या संस्कार शिबिराचे उद्‌घाटन शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी दुपारी १२ वाजता जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते होणार आहे. उद्‌घाटन सत्राला मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. इयत्ता ८ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी हे शिबीर होणार आहे. आतापर्यंत ८०० विद्यार्थ्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडे नोंदणी केली आहे. तीन दिवस चालणाऱ्या या संस्कार शिबिरात अनेक मान्यवरांची विविध विषयांवर व्याख्याने, संवादात्मक सत्रे व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. शिबिराचा समारोप २९ मार्च रोजी होणार आहे. या शिबिराच्या पूर्वतयारी संदर्भात बुधवारी दुपारी ॲड. प्रदीप नागापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली पीपल्स कॉलेज येथे आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीला रणजितसिंघ चिरागीया, मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, गुरुबचनसिंघ शिलेदार, दीपक देशमुख, कुलप्रकाशसिंघ लिखारी, सतपालसिंघ शिलेदार, मनप्रीतसिंघ नंदीग्राम, ॲड. राजवंतसिंघ कदम्ब, परविंदरसिंघ शाहू, सज्जनसिंघ सिद्धू, गणपतसिंघ कामठेकर, नवज्योतसिंघ जहागिरदार, व्यंकट चिलवरवार, प्रा. विजयानंद कदम, बालाजी टिमकीकर, मुख्याध्यापक अनिलकौर खालसा, वानेगावकर, सौ.वानखेडे, सौ. सुरोसे, श्रद्धा सावले, मनिषा पालेपवाड, प्रिया पवार, सोनाली केंद्रे, आकांक्षा चांडोळकर, सौ. फुलारी, सौ. चालिकवार, प्रा.चैताली काकडे, सिमरनकौर जहागिरदार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# मुदखेड शहरातील कृत्रिम पाणी टंचाईविषयी नियोजनाची बैठक बोलवा –प्रवीण गायकवाड

**मुदखेड (प्रतिनिधी)** –येथील कृत्रिम पाणी टंचाई दूर करण्यासाठी मुदखेड नगरपालिकेची बैठक बोलवून ही समस्या दूर करा, अशी मागणी भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रवीण गायकवाड यांनी मनपाच्या मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.



गेल्या आठ दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने शहरातील नागरिकांना कृत्रिम पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. मुदखेड शहरास कमी पडणार नाही एवढा पाणी साठा उपलब्ध असताना नागरिकांना नगरपालिकेच्या नियोजनाअभावी कृत्रिम टंचाईसदृश परिस्थितीतून जावे लागत आहे. या कृत्रिम पाणी टंचाई बाबत तत्काळ बैठक बोलावून पाणी टंचाईसदृश परिस्थितीवर नियंत्रण आणून शहरातील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रवीण गायकवाड यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रति माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. ॲड. श्रीजया चव्हाण, नगराध्यक्ष विश्रांती कदम, पाणी पुरवठा सभापती शाम चंद्रे यांना देऊन कृत्रिम पाणी टंचाई बाबत सर्वांचे लक्ष वेधले आहे.

# महिला महाविद्यालयात अतिथी व्याख्यान संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड महिला शिक्षण संचालित के. आर. एम. महिला महाविद्यालयात समाजशास्त्र विभागामार्फत अतिथी व्याख्यान नुकतेच पार पडले. अतिथी व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. विजया देशमुख यांची उपस्थिती होती.



यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. डॉ. अंबिका गोविंदराव चोंडे यांची उपस्थिती होती. समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रो.डॉ.शोभा इंगळे, प्रा. डॉ. गणेश आडेराव, प्रा. स्वाती बोकारे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या अतिथी व्याख्यानाचे प्रास्ताविक डॉ. शोभा इंगळे यांनी केले.

यावेळी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. अंबिका गोविंदराव चोंडे यांनी विद्यार्थिनींना 'भारतीय स्त्रीविषयक संवैधानिक तरतुदी आणि कायदे' विषयावर सखोल मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, 'भारतीय समाजातील स्त्रियांचे सद्यस्थितीतील स्थान, महिलांची छेडछाड, कौटुंबिक हिंसा, निपुत्री महिलांवरील अन्याय-अत्याचार, फोक्सो कायदा, अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण अशा विविध घटकांवर विद्यार्थिनींचे लक्ष केंद्रित करून महिलाविषयक कायद्यांचे सखोल व विस्तृत मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्या विजया देशमुख यांनी सद्यस्थितीत महिलांचे चूल आणि मूल एवढेच कार्यक्षेत्र मर्यादित न राहता आज प्रत्येक क्षेत्रात महिलांनी नावलौकिक मिळवून शैक्षणिक, राजकीय व सामाजिकदृष्ट्या गरुडझेप घेत आहेत. या अत्याधुनिक काळामध्ये समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी स्त्रीची भूमिका महत्त्वाची आहे. स्त्रीचे अगणितीय कार्य कुटुंबासाठी, समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. आज विज्ञानाने प्रगती केली असली तरी स्त्रीवर लादलेले निकृष्ट दर्जाचे चित्र म्हणावे तसे बदलले नाही. ही चिंतनीय बाब आहे.

या अतिथी व्याख्यानाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गणेश आडेराव यांनी केले तर आभार प्रा. स्वाती बोकारे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# ६ एप्रिल रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा प्रशासनाच्यावतीने सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे लोकशाही दिनाचे आयाजन करण्यात आले आहे.

या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषी विभाग व पाणी पुरवठा समन्वय अधिकारी, जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाची लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

# ज्येष्ठांना न्याय द्या, अन्यथा आंदोलन –डॉ. हंसराज वैद्य

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्यात सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी ज्येष्ठ नागरिक संघ फेडरेशनचे उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभागाचे (फेस्कॉम) अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी केली. ज्येष्ठ नागरिकांच्या मानधनासह विविध प्रलंबित मागण्यांवर त्वरित निर्णय न झाल्यास राज्यभर आंदोलन उभारण्याचा इशाराही डॉ. वैद्य यांनी दिला आहे.



विधानमंडळाच्या अधिवेशनात अनेक आमदारांनी ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांची गंभीरता अधोरेखित केली आहे. नाशिक येथे पार पडलेल्या ३५ व्या राज्यस्तरीय ज्येष्ठ नागरिक अधिवेशनात सर्वानुमते ज्येष्ठांच्या मागण्यांचा ठराव मंजूर करून तो शासन दरबारी सादर करण्यात आला आहे. या अधिवेशनात उपस्थित असलेल्या मंत्र्यांनीही ज्येष्ठांच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेत, मंत्रिमंडळात त्यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते, असेही डॉ. वैद्य यांनी सांगितले.

ज्येष्ठांच्या प्रलंबित प्रश्नांविषयी अद्यापही कार्यवाही झालेली नसल्याची खंत व्यक्त करत डॉ. वैद्य म्हणाले की, राज्यातील ३६ जिल्ह्यांतून आलेल्या सुमारे चार हजार ज्येष्ठ नागरिक प्रतिनिधींनी या अधिवेशनात सहभाग घेतला होता. या सर्वांच्या अपेक्षा शासनाकडून उंचावल्या असून, त्यांची पूर्तता होणे आवश्यक आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना सन्मानपूर्वक जीवन जगता यावे यासाठी मानधन योजना आणि इतर कल्याणकारी उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांकडे सहानुभूतीने पाहून त्वरित निर्णय घ्यावेत अन्यथा वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवरही ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडावे लागेल, असा इशाराही डॉ. हंसराज वैद्य यांनी दिला आहे.

# श्री दत्तप्रभू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत शहीद दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील श्री दत्तप्रभू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत सोमवार, दि. २३ मार्च २०२६ रोजी शहीद दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक महेश धर्माधिकारी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव धर्माधिकारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शहीदांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शहीदांच्या त्याग, देशप्रेम व बलिदानाची जाणीव करून देत त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. जी. नागरगोजे यांनी प्रभावीपणे केले, तर उपस्थितांचे आभार पी. बी. सावंत यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आर. पी. वाघलगावे, सौ. एस. डी. हिवराळे, सौ. एस. एन. पापुलवार, ए. एस. गायकवाड व जी. एस. काळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास परिसरातील पालक, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

# कुंडलवाडी येथे भव्य शोभायात्रा, धर्मसभा उत्साहात संपन्न

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** शहरात हिंदू महासंमेलन व धर्मसभेचे आयोजन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाची सुरुवात श्रीराम मंदिर येथून शोभायात्रेने करण्यात आली. ही शोभायात्रा शहरातील विविध मार्गांनी फिरून के. रामलू मंगल कार्यालय येथे समारोप करण्यात आला. या निमित्ताने शोभायात्रा व धर्मसभा उत्साहात पार पडली.



हिंदू महासंमेलन व धर्मसभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास बालयोगी कृष्ण महाराज (मठसंस्था, मलाराम गुट्टा -निजामाबाद) तसेच डॉ. विरूपक्ष शिवाचार्य महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून धनंजयराव शिवाजीराव तोडकर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. बालयोगी कृष्ण महाराज यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, समाजातील सर्व घटकांनी जातपात विसरून एकत्र येणे ही काळाची गरज आहे. नवतरुणांनी व्यसनांपासून दूर राहून धर्म व संस्कृतीच्या जतनासाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

तसेच त्यांनी सांगितले की, दररोज हनुमान चालीसा पठण व नामस्मरण केल्याने मनातील नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक विचारांची वाढ होते. त्यामुळे तरुणांनी अध्यात्माचा आधार घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी इतर मान्यवरांनीही पर्यावरण, समाज व धर्मरक्षणाची जबाबदारी पार पाडण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रास्ताविक विश्वनाथ दाचावार यांनी तर सूत्रसंचालन माधव हळदेकर यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. नरेश बोधनकर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता हनुमान चालीसा पठणाने करण्यात आली.

# माहूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह व रोजगार मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माहूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, २७ मार्च २०२६ रोजी हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माहूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधीसाठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी शुक्रवार, २७ मार्च २०२६ सकाळी १० वाजतापासून हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माहूर येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

अधिक माहिती व संपर्कासाठी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आनंदनगर रोड, बाबानगर नांदेड ईमेल आयडी nandedrojgar01gmail.com दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ व सोनल मात्रे ८८३०८०७३१२ वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

# आर्य वैश्य महिला मंडळ आयोजित 'कडुलिंब रस प्राशन'ला प्रतिसाद



**हदगाव (प्रतिनिधी)** –दिग्रस येथील आयुर्वेद अभ्यासक किशोर बनगिनवार यांच्या मार्गदर्शनाखाली कडुलिंब सालामृत व रस प्राशनच्या तीन दिवसीय शिबिराचा नुकताच समारोप झाला. हदगाव आर्य वैश्य महिलामंडळाच्यावतीने २१ मार्चपासून न्याय देवता दुर्गा महोत्सव आणि हनुमान मंदिर परिसरात घेण्यात आलेल्या शिबिराला हदगाव शहरात प्रतिसाद मिळाला.

शरीरातील अनेक व्याधींवर गुणकारी असलेल्या कडुलिंबाच्या आंतरसालीच्या रसाचे प्राशन दिग्रस येथील कृषी व्यावसायिक किशोर बनगिनवार हे मागील ४० वर्षापासून करीत असून, त्यामुळे ते निरोगी जीवन जगत आहेत. त्यांच्या या अनुभवाचा फायदा जास्तीत जास्त नागरिकांना व्हावा, या उद्देशाने ते मागील अकरा वर्षांपासून या शिबिराचे आयोजन करीत आहेत.

कडुलिंबाच्या झाडाला आयुर्वेदात अत्यंत महत्त्व आहे. पाडव्यास नवीन मोहोर आलेल्या कडुलिंबाचे औषधीयुक्त गुण अधिक परिणामकारक होत असल्याने संपूर्ण चैत्र महिन्यात अनेक नागरिक कडुलिंबाच्या अंतर सालीच्या रसाचे आणि पाल्याच्या रसाचे सेवन करतात. किशोर बनगिनवार यांच्या अनुभवाचा फायदा जास्तीत जास्त नागरिकांना व्हावा, या उद्देशाने ते मागील अकरा वर्षांपासून ठिकठिकाणी या शिबिराचे आयोजन करीत आहेत. हदगांव येथे मागील तीन वर्षापासून आयोजित करण्यात येत असलेले हे शिबीर यावर्षी २१ मार्च ते २३ मार्चपर्यंत दरम्यान घेण्यात आले.

या रस प्राशन शिबिराचे उद्‌घाटन किशोर बनगिरवार दिग्रस, सचिन बनगिनवार नगरपालिका उपाध्यक्ष दिग्रस, सौ. स्मिता उत्तरवार आर्य वैश्य महिला मंडळ अध्यक्ष दिग्रस, सौ. लाभशेटवार आर्य वैश्य महिला मंडळ सचिव दिग्रस, हदगाव नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. रोहिनी वानखेडे, न पा उपाध्यक्षा सौ. सुनंदा भोळे, उमरखेडचे उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंतराव गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

# धम्मगुरु भदंत पंयाबोधी थेरो ३६ उपासकांसह थायलंड दौऱ्यावर



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा तालुक्यातील खुरगाव-नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक, संघनायक तथा धम्मगुरु भदंत पंयाबोधी थेरो हे थायलंडच्या धम्माभ्यास दौऱ्याकरिता येथील हुजुरसाहेब नांदेड रेल्वेस्थानकावरुन रवाना झाले आहेत.

तेलंगणा मार्गे बँकाक, पाटाया, धम्मगया, आयुथाया अशा विविध ऐतिहासिक ठिकाणी जाणार असून, तेथील बौद्ध संस्कृती व लोकजीवनाचा अभ्यास करणार आहेत. श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने बौद्ध उपासक, उपासिकांसाठी जगातील बौद्ध राष्ट्रांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात येतो. धम्मदीक्षा सुवर्ण काळाचे औचित्य साधून सदरील दौरा आयोजित करण्यात आला आहे. यात भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह अशोक कोल्हे, अरुणा कोल्हे, दैवशाला गोंडाणे, संघमित्रा पंडित, वंदना थोरात, वंदना नरवाडे, यशोधरा नरवाडे, अशोक ढबाले, चतुरा ढबाले, गणपत नरवाडे, गंगासागर इंगोले, भानुदास सोनकांबळे, ऊर्मिला सोनकांबळे, गोविंद पोहरे, दैवशाला पोहरे, देवानंद नवघडे, खुराजी भगत, माया भगत, मोहन गर्दनमारे, शिला गर्दनमारे, मधुकर सोनकांबळे, सुमन सोनकांबळे, प्रकाश सुर्यवंशी, आशा सूर्यवंशी, शकुंतला वडगावकर, नंदा गोवंदे, ज्योती गोवंदे, नामदेव आठवले, वंदना आठवले, रामराव बोधने, जयश्री डोंगरे, समाधान सुर्वे, सुष्मिता सुर्वे, निवृत्ती पिंपळे, सुभाष डोंगरे आदी सहभागी झाले आहेत.

फॅशन|संसार|सौंदर्य
सखी

# उन्हाळ्यातलं सौंदर्य...

## लग्नाआधी करायच्या काही खास गोष्टी!



**लग्न हे आयुष्यात एकदाच होते. त्यामुळे लग्नात आपण जास्तीत जास्त सुंदर दिसावे आणि आपला लुक सर्वांच्या लक्षात राहावा ही प्रत्येक तरुणीची इच्छा रास्त आहे. पण जर तुम्हाला तुमच्या लग्नात सर्वात सुंदर दिसायचे असेल तर साहजिकच तुम्हाला तुमच्या त्वचेची काळजी घ्यावी लागेल. जी तरुणी आपल्या त्वचेची नियमित काळजी घेते, त्यांना लग्नासाठी आपल्या त्वचेवर आणि सुंदर दिसण्यावर जास्त मेहनत घेण्याची गरज भासत नाही. कारण त्यांची त्वचा आधीच तयार झालेली असते. तुम्हाला सुद्धा तुमच्या लग्नात सुंदर दिसायचे असेल तर तुम्ही सुद्धा लग्नाआधी काही खास गोष्टी करायला घेतल्या पाहिजेत. आता अनेक मुलींना याबाबत जास्त कल्पना नसते. पण काळजी करू नका आज हा खास लेख आम्ही तुमच्यासाठीच घेऊन आलो आहोत.**

- वॅक्सिंग : थ्रेडींग प्रमाणे तरुणी वॅक्सिंग करण्याला सुद्धा जास्त महत्त्व देतात आणि त्या वॅक्सिंग ही सहसा मेन इव्हेंटच्या आधी करतात. अर्थात लग्नाच्या दिवस उजाडण्याच्या एक दिवस आधी करतात. असे केल्याने पूर्ण फंक्शन मध्ये त्यांची त्वचा हेअर फ्री दिसते आणि त्या स्टायलिश ब्लाऊज वा अन्य ओपन कपडे अधिक कॉन्फिडन्टली परिधान करू शकतात. सामान्य वॅक्सिंग पेक्षा ब्राईडल वॅक्सिंग थोडी वेगळी असते. कारण यात केवळ पाय आणि हातच नाही तर पूर्ण बॉडी सुद्धा वॅक्स केली जाते.
- बॉडी पॉलिशिंगः वॅक्सिंग मुळे बॉडी हेअर फ्री आणि क्लीन होते तर बॉडी पॉलिश केल्याने त्वचा मस्त एक्सफोलिएट होते. हे डीप एक्सफॉलिएशन डेड स्किनला रिमूव्ह करते यामुळे त्वचा जास्त ग्लोइंग आणि इव्हन टोन होते. ह्यामुळे न्यू सेल्स जनरेशन सुद्धा प्रमोट होतात. यामुळे स्किनला एक हेल्दी लूक मिळतो आणि याच परिणाम सुद्धा जास्त काळ टिकतो. बॉडी पॉलिशिंग जर चांगल्या क्वालिटीची असेल तर हनिमून पिरियड पर्यंत सुध्दा त्वचा अगदी परफेक्ट राहते.



- फेशियल : आता या फेशियल बद्दल वेगळं काय सांगायचं. मुली लग्नाच्या खूप आधीपासूनच फेशियल करत असतात पण लग्नाच्या अगदी एक आठवडा आधी खास ब्राईडल फेशियल केलं जातं. यात नववधूच्या चेहऱ्याला एक्सफॉलिएट करण्यापासून ते मसाज करण्यापर्यंत आणि अनेक प्रकारचे मास्क लावण्यापर्यंत विविध ब्यूटी केअरचा समावेश होतो. फेशियलमुळे त्वचा ग्लो होते आणि लग्नाच्या दिवशी नववधूचा चेहरा अगदी फ्रेश आणि आकर्षक दिसतो. त्यामुळे फेशियल ही लग्नाआधीच्या मस्ट डू थिंग्सपैकी एक आहे.
- मॅनीक्योर-पॅडीक्योर : मॅनिक्युअर आणि पेडीक्योर हे असे सौंदर्य उपचार आहेत जे पाय, हात आणि नखे सुंदर आणि मऊ देखील करतात. त्यात नखे साफ करणे, क्लिपिंग करणे, नखांना आकार देणे, फाइल करणे आणि पॉलिश करणे समाविष्ट आहे. यावेळी नेलपेंट देखील लावले जाते. अनेक नववधूंना नेल आर्ट करून घ्यायला आवडते जेणेकरून त्यांची नखे त्यांच्या ब्रायडल ड्रेसला सुट होतील.
- हेअर केअर : तुम्ही तुमच्या त्वचेसाठी लग्नाआधी खूप काही केलं पण आपल्या केसांसाठी काहीच नाही केलं तर ती तुमची सर्वात मोठी चूक ठरू शकते. त्यामुळे जेवढं महत्त्व तुम्ही स्किन केअरला देता तेवढंच महत्त्व तुम्ही हेअर केअरला सुद्धा द्या. वेडिंगच्या एक आठवडा आधी तुम्ही हेअर केअरला सुरुवात करू शकता. यात वॉश पासून स्पा, कटिंग, स्मूदनिंग यान गोष्टींचा समावेश होतो. काही मुली स्ट्रेटनिंग देखील करतात. हेअर केअर बऱ्याचदा या गोष्टीवर अवलंबून असते की तुमचा वेडिंग लूक कसा आहे.
- थ्रेडींग : सामान्यतः लग्नाचे कार्यक्रम हे एक आठवडा आधी सुरू होतात. तेव्हा मुली याच आठवड्याच्या सुरुवातीला आयब्रो आणि अप्पर लिप्स करणे प्रिफर करतात. याआधी त्या आपल्या भुवयांना नीट वाढू देतात जेणेकरून लग्नाच्या दिवशी त्यांच्या भुवया मोठ्या आणि भरलेल्या दिसतील. तर अप्पर लिप्स यासाठी केले जातात जेणेकरून लग्नाच्या दिवशी अप्पर लिप्स जास्त क्लीन दिसावेत. त्यामुळे लग्नाच्या आधी तुम्ही सुद्धा या गोष्टी अवश्य करा.

## स्किन करपटली?

**उन्हाळ्यात उन्हाच्या तीव्रतेमुळे त्वचेवर काळसरपणा येतो, ज्याला आपण सन टॅन म्हणतो. अनेक वेळा सनस्क्रीन वापरूनही त्वचेवर काळे डाग किंवा टॅनिंग दिसून येते. बाजारात उपलब्ध असलेल्या रासायनिक उपायांपेक्षा घरगुती आणि नैसर्गिक उपाय जास्त प्रभावी ठरतात. हे उपाय त्वचेची निगा राखण्यास मदत करतात आणि कोणतेही दुष्परिणाम न होता टॅनिंग दूर करतात. चला, मग जाणून घेऊया काही सोपे आणि नैसर्गिक घरगुती उपाय, जे तुमच्या त्वचेला पूर्वीप्रमाणे उजळ आणि सुंदर बनवतील.**



- लिंबाचा रस अन् मध : लिंबामध्ये नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असतात, जे त्वचेवरील टॅन दूर करण्यास मदत करतात. मध त्वचेला मॉइश्चरायझ करतो आणि चमकदार बनवतो. लिंबाचा रस आणि मध समप्रमाणात मिसळून त्वचेवर लावा. १५-२० मिनिटांनी कोमट पाण्याने धुवा. आठवड्यातून दोन वेळा हा उपाय केल्यास त्वचा स्वच्छ आणि उजळ दिसेल.
- दही आणि बेसनचा स्क्रब : दहीमध्ये लॅक्टिक ॲसिड असते, जे त्वचेतील मृत पेशी काढून टाकण्यास मदत करते, तर बेसन त्वचेला उजळ बनवते. दोन चमचे दही आणि एक चमचा बेसन मिसळून पेस्ट तयार करा. ही पेस्ट चेहरा आणि हातांवर लावा आणि हलक्या हाताने मसाज करा. १५ मिनिटांनी पाण्याने धुवा. हा उपाय आठवड्यातून तीन वेळा करा.
- एलोवेरा आणि गुलाबपाणी : एलोवेरामध्ये त्वचेला थंडावा देण्याचे गुणधर्म आहेत, तर गुलाबपाणी त्वचेला ताजेतवाने बनवते. ताज्या एलोवेराच्या गरामध्ये दोन चमचे गुलाबपाणी मिसळा आणि रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर लावा. सकाळी थंड पाण्याने धुवा. यामुळे त्वचेवरील टॅन कमी होईल आणि त्वचा मृदू आणि तजेलदार दिसेल.
- टोमॅटो आणि दुधाचा पॅक : टोमॅटोमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स असतात, जे टॅन दूर करण्यात मदत करतात, तर दूध त्वचेला पोषण देते. टोमॅटोचा रस आणि कच्चे दूध समप्रमाणात मिसळा आणि टॅन झालेल्या भागावर लावा. २० मिनिटांनी धुवा. यामुळे त्वचेचा रंग सुधारेल आणि टॅनिंग लवकर कमी होईल.
- बटाट्याचा रस : बटाट्यामध्ये नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असतात, जे टॅनिंग दूर करण्यास मदत करतात. बटाट्याचा रस काढून त्वचेवर लावा आणि १५-२० मिनिटे ठेवा. त्यानंतर कोमट पाण्याने धुवा. हा उपाय नियमित केल्यास त्वचा उजळ आणि टॅन फ्री दिसेल.

## उन्हाळ्यात केसं कापणे योग्य?

- केस अतिशय छोटे करणे : कडक उन्हाळ्यात अनेक स्त्रिया केस लहान करतात. पण केस लहान करताना हे लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे की हेअरकट उन्हाळ्यासाठी अनुकूल असावे. फ्रिंज हेअर लूक किंवा मानेचे केस चेहऱ्यावर वारंवार येतात आणि यामुळे मुरुमांची समस्या तसेच उन्हाळ्यात त्रास वाढू शकतो. उन्हाळ्यातही कपाळावर मुरूम येऊ शकतात हे लक्षात ठेवा. त्यामुळे असा हेअर कट करणे टाळा. हेअर कटसोबतच उन्हाळ्यात शॅम्पू आणि तेलाकडे विशेष लक्ष द्या.
- शॅम्पू सर्वाधिक अन् कंडिशनर कमी करणं टाळा : व्यायाम केल्यानंतर, स्वयंपाकघरात काम करताना किंवा ऑफिसला जाताना, या ऋतूमध्ये केसांना घाम येणे आणि चिकट होणे सामान्य आहे. साहजिकच आंघोळ करताना केस धुवावेसे वाटतात, त्यामुळे बहुतेक लोक या ऋतूत केस पुन्हा पुन्हा धुतात, पण कंडिशनर वापरणे टाळतात. वारंवार शॅम्पू केल्याने केस आणि टाळूचे नैसर्गिक तेलही कमी होते. असे करण्याऐवजी केसांच्या कंडिशनिंगवर अधिक लक्ष केंद्रित करा. केसांना कंडिशनर किंवा मास्क लावा आणि थोडा वेळ तसाच राहू द्या जेणेकरून केस मजबूत राहतील.
- पूलमध्ये घ्या विशेष काळजी : हेअर सीरम, हीट प्रोडक्ट्सचा या उन्हाळ्यात वापर करा. अनेकदा गरमीत स्विमिंग पूलला जाणे होते. अशावेळी केसांची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. पूलमधील क्लोरीन पूर्णपणे कोरड्या केसांमध्ये शोषले जाते आणि केसांना नुकसान होते. केसांसाठी सनस्क्रीनही बाजारात उपलब्ध आहेत. तसेच हेअर कॅपचा वापर देखील स्विमिंग पूलमध्ये करू शकता.
- केसांना नॅच्युरल राहू द्या : नॅच्युरल केस अनेकदा आनंद देतात. तुमचा लूक एनहान्स करायला फायदेशीर असतात. मात्र अनेकदा महिला केसांना कर्ली करणे किंवा थोडे वेवी करणे पसंत करतात. पण ही तुमची आवड उन्हाळ्यात घातक ठरू शकते. केसं अतिशय नैसर्गिक राहू द्या. या नैसर्गिक केसांना उन्हाळ्यात कोणत्या प्रोडक्ट्सपासून लांब ठेवा.

## घामामुळे टिकत नाही मेकअप

मेकअप हा तरुणींचा अगदी आवडीचा विषय. एखादा घरगुती कार्यक्रम असो वा विवाहसोहळा प्रत्येकीला आपला मेकअप अगदी परफेक्ट लागतो. आपला मेकअप आपल्या ड्रेसिंग स्टाइलशी मिळता जुळता आहे का?, कोणत्या प्रकारचा मेकअप केला की तो आपल्याला अगदी चांगला दिसेल? असे अनेक प्रश्न तरुणींच्या मनात असतात. तसेच बहुतांश जणी अनेक वेगवेगळ्या प्रोडक्टचा मेकअपसाठी वापर करतात. आयलायनरपासून ते फाउंडेशनपर्यंत सारं काही मुलींना अगदी नीट आणि व्यवस्थित लागतं. बराच काळ आपल्या चेहऱ्यावरील मेकअप टिकून राहावा म्हणून बऱ्याच तरुणी वेगवेगळे उपाय करतात. मात्र मेकअपसाठी चांगल्या प्रोडक्टचा वापर करून देखील बऱ्याचदा चेहऱ्याचा मेकअप उतरतो. सतत येणारा घाम, त्यामुळे होणारी तेलकट त्वचा यामुळे काही वेळामध्येच चेहऱ्यावरील मेकअप उतरण्यास सुरुवात होते. परिणामी चेहरा काळवंडलेला दिसतो. सतत तुम्हाला घाम येत असेल आणि चेहऱ्यावरील मेकअप जास्त काळ टिकत नसेल तर कोणते उपाय केले पाहिजे, कशाप्रकारचा मेकअप करावा हे या लेखाच्या आधारे आपण जाणून घेणार आहोत.

### यामुळे मेकअप दिसेल अधिक उठून

आयलायनर, मस्कारा, आयशॅडो, काजळ मेकअपमधील महत्त्वाच्या गोष्टी आहेत. डोळे अधिक आकर्षक दिसावे म्हणून बऱ्याच जणी आयशॅडो, आलायनरचा वापर करतात. पण त्याचबरोबरीने काजळ, आयलायनर वॉटर प्रुफ पद्धतीचं असलं पाहिजे याकडेही लक्ष द्या. यामुळे तुमच्या डोळ्याचा मेकअप खराब होणार नाही. तसेच तुमच्या पसंतीनुसार आयलायनर अधिक भडक किंवा पातळ लावा. तुमच्या ड्रेसिंग स्टाइलिश मिळतं-जुळतं आयशॅडो चेहऱ्याचं सौंदर्य अधिक खुलून दिसण्यास मदत करतं. लिपस्टिक टोन निवडताना देखील योग्य पद्धतीने निवडा. लाइट टोन किंवा डार्क टोन लिपस्टिकची निवड तुम्ही तुमच्या चेहरा तसेच मेकअपनुसार करू शकता. तसेच मेकअप टिकून राहण्यासाठी मेकअप सेटिंग स्प्रेचा वापर करा. मात्र चेहऱ्यावर या विविध प्रोडक्टचा वापर करण्यापूर्वी ब्युटिशियन तसेच तज्ञांचा जरूर सल्ला घ्या.

### फाउंडेशन, फेस पावडर, हायलायटर

चेहऱ्याला फाउंडेशन लावताना अगदी कमी प्रमाणात लावा. तुम्ही तुमच्या आवडीनुसार विविध प्रोडक्टच्या फाउंडेशनचा वापर करू शकता. फाउंडेशन लावल्यानंतर चेहऱ्याला हलक्या हाताने फेस पावडर लावा. यामुळे तुम्हाला घाम येणार नाही. त्यानंतर गाल तसेच नाकाला हायलायटर लावा. हायलायटरमुळे मेकअप अधिक उठून दिसण्यास मदत मिळेल. मेकअप करताना फाउंडेशन, फेस पावडर, हायलायटरचा वापर योग्य पद्धतीने केला की चेहरा काळवंडलेला दिसत नाही. तसेच तुम्ही अगदी उठून दिसता.

### फेसपॅकच्या वापरानंतर चेहरा स्वच्छ धुवा

मेकअप करण्यापूर्वी चेहऱ्याची कशी काळजी घेतली पाहिजे, चेहरा स्वच्छ न धुतल्यामुळे त्वचेवर काय परिणाम होतो याची माहिती असणं देखील तितकंच गरजेचं आहे. मेकअप करण्यापूर्वी फेसवॉशचा वापर करून चेहरा स्वच्छ धुवून घ्या. घामामुळे चेहरा अधिक तेलकट दिसायला लागतो. मग अशावेळी मेकअप करण्यापूर्वी घरगुती तयार केलेला फेसपॅकही चेहऱ्याला लावू शकता. फेसपॅकचा वापर केल्यानंतर देखील चेहरा स्वच्छ धुवून घ्या.



### मेकअपपूर्वी 'या' गोष्टींचा वापर करा

- टोनर : मेकअप करण्यापूर्वी चेहऱ्यावर जमा झालेली धुळ, घाण साफ करणं हा मेकअपचा महत्त्वाचा भाग आहे. यासाठी तुम्ही टोनरचा वापर करू शकता. मेकअप करण्यापूर्वी टोनरचा वापर केल्यामुळे त्वचा स्वच्छ राहते. तसेच त्वचेमधील छिद्रांमध्ये असणारी धुळ देखील साफ होते.
- मॉइश्चरायजर : मेकअप करताना किंवा करण्याआधी काही गोष्टींचा वापर तुमच्या चेहऱ्यासाठी फायदेशीर ठरू शकतो. मेकअप करण्यापूर्वी मॉइश्चरायजरचा वापर करा. यामुळे मेकअप जास्त काळ टिकून राहतो. तसेच त्वचा काळवंडलेली देखील वाटत नाही.

### मेकअपचा बेस कसा असावा?

- प्रायमर : मेकअप बेसची पहिली पायरी म्हणजे प्रायमर. प्रथम चेहरा तसेच मानेला मेकअप ब्लेंडरच्या मदतीने प्रायमरल लावा. चेहऱ्यावर हे प्रायमर योग्य पद्धतीने सेट होऊ द्या. यामुळे चेहऱ्यावर एक वेगळाच ग्लो येईल. तसेच त्वचा मऊ आणि सुंदर दिसण्यास मदत मिळेल.
- कंसिलर : प्रायमर चेहरा तसेच मानेला योग्य पद्धतीने लावल्यानंतर कंसिलर घ्या. मेकअप ब्लेंडरच्या सहाय्याने कंसिलर चेहरा, मानेला लावा. कंसिलर मेकअप बेसमधील महत्त्वाचा भाग आहे. यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील डाग, डार्क सर्कल्स दिसेनासे होतात.



## लग्नासाठी निवडा हे रंग!

**आताचा सगळा सीझन हा लग्नाचा आहे. त्यामुळे सगळीकडे खरेदीला चांगलाच जोर आला आहे. कपड्यांची, सोन्याची खरेदी मोठ्याप्रमाणात होताना दिसत आहे. तुम्हीही या सीझनमध्ये म्हणजेच लग्नाच्या या सीझनमध्ये लग्न करण्याचा विचार करत असाल तर रंगाचे काही खास ट्रेंड फॉलो करायला हवेत. आम्ही या सीझनचे असे काही रंग तुम्हाला सांगणार आहोत. जे तुम्ही नक्कीच तुमच्या लग्नाच्या सीझनमध्ये कुठेतरी वापरायला हवेत. चला जाणून घेऊया असे रंग...**



### लायलॅक

फिक्कट जांभळ्या रंगाची ही शेड सध्या चांगलीच चर्चेमध्ये आहे. डोळ्यांना सुखावणारा असा हा रंग खूप जणांच्या आवडीचा आहे. हा रंग लेहंगा आणि इंडो-वेस्टर्न आऊटफिटमध्ये अगदी सहज मिळू लागला आहे. या रंगाचा लेहंगा तुम्ही निवडला तर तुम्हाला त्यावर छान ज्वेलरी देखील निवडता येतात. मोती किंवा वेगवेगळ्या स्टोन्स ज्वेलरी या रंगावर फारच उठून दिसतात. तुमच्या जोडीदाराला त्यामुळे कोणताही लाईट रंग निवडण्याची मुभा मिळते. तुमचा जोडीदार पांढरा, मोती अशा शेड्समध्ये आरामात जाऊ शकतो. जर फिक्कट रंग तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही अगदी हमखास या रंगाची निवड करा.

### पीनट कलर

पीनट अर्थात शेंगदाणा. तुम्ही टरफलातून शेंगदाणा काढून खाल्ला असेल तर त्याचे वेगवेगळे शेड तुम्हाला नक्कीच माहीत असेल. गुलाबी- चॉकलेटी याचा उत्तम समतोल साधलेला हा रंग दिसायला खूपच रिच आणि चांगला दिसतो. अगदी कोणत्याही स्किनटोनवर हा रंग उठून दिसणार नाही असे मुळीच होणार नाही. त्यामुळे हा रंगही सध्या चांगलाच ट्रेंडमध्ये आहे. त्यामुळे जर तुम्हाला तुमच्या लेहंग्याचा रंग हा घ्यायचा असेल तर तुम्ही हा रंग निवडू शकता. याला थोडा बोल्ड लुक द्यायचा असेल तर तुम्ही त्यावर हेव्ही वर्क घेऊ शकता.

### वाईन रंग

वाईन रंग हा फॅशनच्या बाहेर कधीच जाऊ शकत नाही. विशेषतः काही ब्राईड्सना गडद रंग घालायला आवडतात. त्यांच्यासाठी हा रंग तर एकदम खासच आहे. जर तुम्हाला गडद रंग आवडत असेल तुम्हाला वाईन शेड घ्यायला काहीच हरकत नाही. या रंगावर तुम्हाला मोती आणि काही इमिटेशन ज्वेलरी वापरता येतात. असा लेहंगा घातल्यानंतर तुम्हाला आजुबाजूचे डेकोरेशन हे थोडे लाईट रंगाचे निवडावे लागते. त्यामुळे तुम्ही हा रंग घेण्याचा विचार करत असाल तर लग्नासाठीचे डेकोरेशन कसे असावे याचा देखील विचार करा.

### हॉट पिंक

*तुम्हाला गडद रंग निवडायचा असेल आणि तो ट्रेंडी हवा असे देखील वाटत असेल तर तुम्ही हॉट पिंक रंग निवडायलाही काहीच हरकत नाही. हा रंग खूपच चांगला उठून दिसतो. हॉट पिंक रंगावर तुम्हाला विरुद्ध म्हणजेच कॉन्ट्रास रंगाचे दुपट्टे किंवा ज्वेलरी निवडू शकता. या रंगाचा ब्लाऊज निवडताना ब्राईडल ब्लाऊजची निवड केली तर ते अधिक चांगे दिसतात. आता तुम्हाला जर काही खास रंग हवे असतील आणि तुमचा खास दिवस खूपच खास करायचा असेल तर या रंगाची निवड करू शकता.*

# शरद पवारांकडून महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर यांचा सत्कार

## हर्षवर्धनला १४ लाख तर तालमीसाठी ५० लाखांचे अर्थसहाय्य

**पुणे (प्रतिनिधी) –** कुस्ती शौकिनाचं शहर असलेल्या पुण्यातील वाघोली येथे नुकतेच संपन्न झालेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा विजता, डबल महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीरने राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. डबल महाराष्ट्र केसरी पैलवान राजकीय वस्तादाला भेटल्याची चर्चा यावेळी रंगली. हर्षवर्धनने शरद पवारांचे आशीर्वाद घेतल्यानंतर महाराष्ट्र केसरी विजयाची मानाची चांदीची गदा शरद पवार यांच्या हाती देत फोटो काढले. तर, खासदार शरद पवार यांनी हर्षवर्धन सदगीरला १२ लाख रूपयांची शिष्यवृत्ती तर काका पवार यांच्या पुण्यातल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल या तालमीसाठी ५०



लाख रुपयांच्या अर्थसहाय्याची घोषणा केली आहे. त्यापैकी २५ लाखांचा पहिला हप्ता काका पवार यांच्या सुपूर्द करण्यात आला.

हर्षवर्धन सदगीर आणि अर्जुन पुरस्कार विजेते प्रशिक्षक काका पवार यांनी शरद पवार यांची नुकतीच मुंबईत भेट घेतली. यावेळी उद्योजक मोहसीन बागवान, कुस्ती प्रशिक्षक शिवाजी कोळी महाराष्ट्र चॅम्पियन पृथ्वीराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. तर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही काका पवार व हर्षवर्धन सदगीर यांनी भेट घेतली. त्यावेळी येत्या अधिवेशनात नाशिक महानगरपालिकेत नोकरी देण्याचे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिली असल्याचे काका पवार यांनी सांगितले आहे.

दरम्यान, हर्षवर्धनने दोनच महाराष्ट्र केसरीचा किताब जिंकल्यानंतर मनातील खंत बोलून दाखवली होती. मी नाशिक येथे मंत्री दादा भुसेंना भेटलो, एकनाथ शिंदेंनाही भेटलो होतो. पण, मला सरकारी नोकरी मिळाली नाही, आता मला नोकरीची गरज नाही असेही त्याने म्हटले होते.

हर्षवर्धन सदगीर यांचे कौतुक करीत ऑलिम्पिकपटू होण्यासाठी पुढील २ वर्षांसाठी महिना ५० हजार प्रमाणे १२ लाखांच्या शिष्यवृत्तीचा धनादेशही शरद पवार यांच्याकडून देण्यात आला. काका पवार यांच्या तालमीतील हर्षवर्धनसह ११ मल्लांनी पदकाची लयलूट केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलाला ५० लाख रूपयांचं आर्थिक सहाय्य शरद पवार यांनी दिलं आहे.

# आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती घसरल्या

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** पश्चिम आशियातील शांततेच्या आशेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती आज पुन्हा एकदा १०० डॉलर प्रति बॅरलच्या खाली घसरल्या आहेत. भारतीय वेळेनुसार सकाळी १०:१५ वाजता, ब्रेंट क्रूडचा व्यापार ९९.१७ डॉलर प्रति बॅरलवर, तर वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूडचा व्यापार ८८.५१ डॉलर प्रति बॅरलवर होत होता. यापूर्वी, आधीच्या दिवशी, मंगळवारी, ब्रेंट क्रूड १०४.४९




डॉलर प्रति बॅरलवर बंद झाले होते. डब्ल्यूटीआय क्रूडने मंगळवारचा व्यापार ९२.३५ डॉलर प्रति बॅरलवर संपवला होता.

आजच्या व्यापाराच्या सुरुवातीला, ब्रेंट क्रूड जवळपास सहा टक्क्यांनी घसरून ९९.८३ डॉलर प्रति बॅरलवर उघडले. व्यापार सुरू झाल्यानंतर लगेचच, ब्रेंट क्रूडच्या किमती ९७.१८ डॉलर प्रति बॅरलपर्यंत घसरल्या. या घसरणीनंतर, ब्रेंट क्रूड तेलाच्या किमतीत वाढ झाली आणि ती क्षणभर १००.०३ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचली. तथापि, त्यानंतर लगेचच, किंमत पुन्हा १०० डॉलरच्या खाली घसरली. सकाळी १०:१५ पर्यंत, ब्रेंट क्रूड तेलाचा व्यापार प्रति बॅरल ९९.१७ डॉलरवर होत होता, ज्यात ५.११ टक्क्यांची घट झाली होती. ब्रेंट क्रूड तेलाप्रमाणेच, वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूड तेलाच्या किमतीतही पाच टक्क्यांहून अधिक घट नोंदवली गेली. डब्ल्यूटीआय क्रूड तेलाचा व्यापार प्रति बॅरल ८८.५३ डॉलरवर सुरू झाला. थोड्याच वेळात, त्याची किंमत प्रति बॅरल ८६.७२ डॉलरपर्यंत घसरली. यानंतर, डब्ल्यूटीआय क्रूड तेलाची किंमत थोडक्यात प्रति बॅरल ८९.३६ डॉलरपर्यंत वाढली. सकाळी १०:१५ पर्यंत, डब्ल्यूटीआय क्रूडचा व्यापार प्रति बॅरल ८८.५१ डॉलरवर होत होता, ज्यात ४.०८ टक्क्यांची घट झाली होती.

## सोनिया गांधी रुग्णालयात दाखल; प्रकृती स्थिर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** पोटात संसर्ग झाल्याची तक्रार केल्यानंतर काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांना मंगळवारी रात्री दिल्लीतील सर गंगा राम रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या मते, त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे.

बुधवारी रुग्णालयाने जारी केलेल्या माहितीनुसार, सोनिया गांधी यांना मंगळवारी रात्री १०:२२ वाजता सर गंगा राम रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. अजय स्वरूप यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, डॉक्टर त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

## ठाण्यात 'मॅन-सिक' मानसिक आरोग्य जनजागृती उपक्रम उत्साहात संपन्न

**ठाणे (प्रतिनिधी) –** नागरिकांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला 'मॅन-सिक' हा सार्वजनिक जनजागृती उपक्रम ठाणे महानगरपालिका सभागृह येथे उत्साहात व यशस्वीपणे पार पडला.

जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे तसेच ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ, वेसाक इंडिया आणि रिझोनांझ कम्यूनिकेशन्स यांचे सहकार्य लाभले.

या कार्यशाळेस प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले ठाणे प्रादेशिक रुग्णालयाचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अमोल भुसारे यांनी मार्गदर्शन केले. मौन सोडू, संवाद साधू तसेच जाणिवेतून जागृतीकडे या संकल्पनांवर आधारित या कार्यक्रमात मानसिक आरोग्याविषयी खुले व सकारात्मक संवाद घडवून आणण्यावर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान 'मॅन-सिक सिनेमॅटिक इनिशिएटिव्ह' अंतर्गत सादर करण्यात आलेल्या लघुपटांनी उपस्थितांच्या मनावर प्रभाव टाकत मानसिक आरोग्याबाबत सहानुभूती आणि जाणीव निर्माण केली.

## मद्यप्रेमींच्या खिशाला लागणार कात्री, बिअर आणि दारुच्या किमती वाढणार

**मुंबई (प्रतिनिधी) –**दारुपिणाऱ्यांच्या खिशाला लवकरच कात्री लागू शकते. कारण दारुच्या किमती वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वाढत्या उत्पादन खर्चामुळे भारतीय मद्य बाजारपेठेत किमती वाढण्याचे संकेत मिळत आहेत. बिअर उत्पादकांनी आगामी उन्हाळ्यात पुरवठा विस्कळीत होण्याचा इशारा दिला असून, मद्य उत्पादक संघटनांनी राज्यांकडे भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या किमती सुधारण्याची विनंती केली आहे.

गेल्या काही आठवड्यांत पॅकिंग मटेरियलच्या किमतीत १०-१२ टक्के वाढ झाली आहे. काचेच्या बाटल्यांच्या किमती २० टक्क्यांनी वाढल्या आहेत, तर ल्युमिनियमच्या टंचाईमुळे बिअर कॅन्सच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. इंधन दरवाढीमुळे मालवाहतूक खर्च १० टक्क्यांनी महागला असून, त्याचा थेट परिणाम मद्याच्या अंतिम किमतीवर होत आहे. 'ब्र्युअर्स असोसिएशन ऑफ इंडिया'च्या मते, जागतिक संघर्षांमुळे कच्च्या मालाचा पुरवठा साखळीवर मोठा ताण आला आहे. कागदी पुठ्ठ्यांच्या किमती चक्क १०० टक्क्यांनी वाढल्या आहेत. तसेच एलएनजीच्या (डछॠ) तुटवड्यामुळे काचेच्या बाटल्यांचे उत्पादनही प्रभावित झाले आहे. 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन अल्कोहोलिक बेव्हरेज कंपनीज' नुसार, रुपयाचे कमकुवत होणे आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे मद्य उद्योगावर मोठा दबाव आहे. राज्यांनी जर किमती वाढवण्यास परवानगी दिली नाही, तर उत्पादकांना तोटा सहन करावा लागेल आणि बाजारात तुटवडा निर्माण होऊ शकतो.

## माजी आमदाराच्या मुलाची निर्घृण हत्या

**धारवाड (प्रतिनिधी) –** कर्नाटकच्या धारवाडजवळील एका निर्जनस्थळी जळालेल्या कारमध्ये कोळसा झालेला मृतदेह सापडल्याने हत्येचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. हा मृतदेह राजू बोलाशेटी यांचा असल्याचे निष्पन्न झाले असून ते बैलहोंगळचे माजी आमदार बाबुराव बोलाशेटी यांचे पुत्र होते. बैलहोंगळमधील उडीकेरी गावचे रहिवासी असलेले राजू प्रामुख्याने शेती व्यवसायात होते आणि सोमवारपासून ते बेपत्ता होते.

कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारभर त्यांचा फोन वाजत होता पण त्यांनी तो उचलला नाही. अखेर मध्यरात्री अडीचच्या सुमारास त्यांचा फोन स्विच ऑफ झाला. सकाळी आपल्या शेतात जाणाऱ्या स्थानिक नागरिकांना जळालेली कार दिसली आणि त्यांनी तात्काळ पोलिसांना पाचारण केले. कारमधील मृतदेह पूर्णपणे जळून कोळसा झाल्यामुळे ओळख पटवणे कठीण होते. मात्र पोलिसांनी कारच्या नंबर प्लेटवरून ही गाडी राजू बोलाशेटी यांचीच असल्याची पुष्टी केली.

# एलपीजी सिलिंडरच्या बुकिंगच्या अंतिम मुदतीत बदल झाल्याचे वृत्त केंद्र सरकारने फेटाळले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** घरगुती एलपीजी सिलिंडरच्या बुकिंगच्या अंतिम मुदतीत बदल झाल्याबाबत सोशल मीडियावर पसरत असलेले वृत्त केंद्र सरकारने पूर्णपणे फेटाळून लावले आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, एलपीजी बुकिंगच्या नियमांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. शहरांमध्ये २५ दिवसांत आणि ग्रामीण भागात ४५ दिवसांत एलपीजी सिलिंडर उपलब्ध होतील.

बुधवारी जारी केलेल्या एका निवेदनात, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने म्हटले



आहे की, काही बातम्या आणि सोशल मीडियावरील पोस्टमध्ये एलपीजी रिफिल बुकिंगच्या सुधारित अंतिम मुदतीचा दावा केला जात असल्याचे सरकारच्या निर्दर्शनास आले आहे. यामध्ये प्रधानमंत्री उज्ज्वला योजना (झचणध) कनेक्शनसाठी ४५ दिवस, नॉन-झचणध सिंगल-बॉटल कनेक्शनसाठी २५ दिवस आणि नॉन-झचणध डबल-बॉटल कनेक्शनसाठी ३५ दिवसांचा समावेश आहे. मंत्रालयाने म्हटले आहे की, एलपीजी रिफिल बुकिंगची सध्याची अंतिम मुदत कायम राहील. निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, असे कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. सध्याच्या रिफिल बुकिंगच्या अंतिम मुदतीत कोणताही बदल नाही. सरकारने नागरिकांना अशा दिशाभूल करणाऱ्या माहिती आणि अफवांपासून सावध राहण्याचे आणि त्यावर विश्वास न ठेवण्याचे किंवा त्या पुढे न पसरवण्याचे आवाहन केले आहे.

# मनाचा कोंडमारा न करता स्वतःला मुक्तपणे व्यक्त केले पाहिजे - कवी दिगंबर माने

**अहमदपूर (प्रतिनिधी) –** विविध मार्गांनी व्यक्त होणे ही माणसाची मूलभूत गरज असून, आपल्या मनातल्या विचारांचा व भावभावनांचा कोंडमारा न करता प्रत्येकाला मुक्तपणे व्यक्त होता आले पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी प्रा. डॉ. दिगंबर माने यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिगंबर माने हे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, समीक्षक तथा ज्येष्ठ कादंबरीकार प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील हे होते. तर किसान पिठावर स्नेहसंमेलन प्रभारी प्रा. डॉ. सतीश ससाणे, हभप डॉ.




अनिल महाराज मुंढे, विद्यार्थी प्रतिनिधी कु. वैष्णवी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. माने म्हणाले की, आज माणसे माणुसकी सोडून का वागू लागली हे कळायला मार्ग नाही. सत्ता, संपत्ती आणि खोट्या प्रतिष्ठेच्या नादात माणूस नीतीमत्ता गमावून बसला आहे. आजच्या काळात संघर्ष हाच माणसाचा स्थायीभाव बनला असून, आपले जगणेच माणूस विसरून गेला आहे. जीवन सुंदर असून, त्यासाठी स्वतःला ओळखून स्वतःवर प्रेम केले पाहिजे असेही ते पुढे म्हणाले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या अंगभूत कलागुणांना स्नेहसंमेलनातून वाव दिला पाहिजे. जीवनात स्नेहाचा गोडवा निर्माण करण्यासाठी अशा प्रकारची स्नेह संमेलने उपयुक्त ठरतात. विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास करून आपल्या पदवीचा रोजगार निर्मितीसाठी उपयोग करावा. विद्यार्थ्यांनी उद्योगपती भारतरत्न रतन टाटा यांचा आदर्श घ्यावा असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिल महाराज महाराज मुंढे यांनी केले.


**जाहिर प्रगटन**

यादवारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री. शंकर बाळगीर गिरी वय 43 रा. गोपाळचावडी ता. जि. नांदेड मो.नं. 9881361565 यांच्या दिनांक 27.01.2026 यांनी या कार्यालयात त्यांचे मुलीचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव नितीन शंकर गिरी वय 15 रा. गोपाळचावडी ता. जि. नांदेड यांचा राहते घरे गोपाळचावडी ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक 11.08.2010 या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक 27.01.2026 रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - 13.02.2026

स्थळ - नांदेड

तहसिलदार नांदेड करिता

**जाहिर प्रगटन**

यादवारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री. शंकर बाळगीर गिरी वय 43 रा. गोपाळचावडी ता. जि. नांदेड मो.नं. 9881361565 यांच्या दिनांक 27.01.2026 यांनी या कार्यालयात त्यांचे मुलीचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव यशश्री शंकर गिरी वय 01 रा. गोपाळचावडी ता. जि. नांदेड यांचा राहते घरे गोपाळचावडी ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक 11.12.2024 या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक 27.01.2026 रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - 13.02.2026

स्थळ - नांदेड

तहसिलदार नांदेड करिता

**Change In Name**

My old Name is **SHAIKH SHAHNAWAZ** which now I am changing as New Name: **SHAIKH SHAHNAWZ SHOUKATALI** Hence, forth my all correspondence will be done as per my New Name please consider, the same.

Sign by: **SHAIKH SHAHNAWZ SHOUKATALI**

**Address:** H.No.9-2-306, Bilal Nagar, Degloor Naka Road, VTC Itwara, Nanded S.O. Dist. Nanded, Maharashtra - 431604. Mob: 9420181802

**Change In Name**

My Old Name is **MD IMTIYAZ MD AHSAN** which now I am changing as New Name **MOHAMMAD IMTIYAZ MOHAMMAD AHESAN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - H.No. 8-1-174, Mandai Masjid, Chouphala Road, Nanded Mo. 8007751191**

**दुरुस्ती सूचना (CORRIGENDUM)**

मदिनातुल उलूम माध्यमिक शाळा, भोकर यांच्या वतीने दिनांक २४.०३.२०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या शिक्षक पदभरती जाहिरातीमध्ये अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख चुकीने दिनांक ०६/०४/२०२६ अशी नमूद झाली आहे. त्याऐवजी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक ०७/०४/२०२६ अशी वाचण्यात यावी. जाहिरातीतील इतर सर्व अटी व शर्ती यथावत राहतील.

मुख्याध्यापक

मदिनातुल उलूम माध्यमिक शाळा, भोकर

**जाहिर प्रगटन**

माझे अशील अविनाश पि. उमाकांतराव कामठेकर व सौ. नभा भ्र. विवेकराव आंबुलगेकर दोघेही रा. नांदेड यांनी दिलेल्या अधिकार व सुचने वरुन सर्व जनतेस खालीलप्रमाणे सुचीत करण्यात येते की, माझे अशील यांनी मालमत्ता जिचे विस्तृत वर्णन मौजे तरोडा खुर्द ता. व जि. नांदेड येथील गट क्र. १३६ पैकी लांबी उत्तर दक्षीण ४५ फुट व रुंदी पुर्व पश्चीम पुर्वेकडुन ३६ फुट व पश्चिमेकडुन ४३ फुट याप्रमाणे क्षेत्रफळ असलेल्या व ज्याच्या चतु:सिमा पुर्वेस : श्री. उल्लेवाड यांचे घर पश्चिमेस: श्री. किशन केशवराव जांबकर यांचे घर, दक्षिणेस श्री. आंबोरे यांचे घर व उत्तरेस सार्वजनीक रस्ता असलेल्या व आज रोजी चक्रधर स्वामी नगर नांदेड येथे स्थीत असलेल्या भुखंड क्र. ४४ वर बांधण्यात आलेल्या दोन मजली ईमारती संदर्भाने (यापुढे उक्तमालमत्ता असे उल्लेखीत करण्यात आले आहे) नांदेड येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ट स्तर यांच्या न्यायालयात विशेष दिवाणी दावा क्र. २१४/२०२२ दाखल केला आहे. सदर दावा दाखल करुन माझे अशिलानी दिवाणी न्यायालयाकडुन उमाकांतराव कामठेकर व कृष्णाबाई कुलकर्णी उर्फ कृष्णाबाई कामठेकर यांचे वारस या नात्याने उक्त मालमतेचे मालक असल्यासंदर्भातील जाहीरनामा माघितला आहे. सदर दावा आज रोजी न्यायप्रविष्ट असुन पुढील तारीख दि. 07.04.2026 रोजी ठेवण्यात आलेली आहे. तसेच उक्त मालमत्तेसंदर्भाने दिवाणी न्यायाधीश साहेब नांदेड यानी रिसिव्हर नेमला असुन या आदेशास अव्हानीत करणारे अपील मिरा विरुद्ध अविनाश असे नांदेड येथील तदर्थ जिल्हा न्यायाधिश साहेब-१ यांचे समक्ष दिवाणी किरकोळ अपिल क्र. ७१/२०२३ देखील दाखल असुन ते दि. 18.04.2026 रोजी सुनावणी साठी ठेवण्यात आले आहे.

मीरा भ्र. सतीष वैद्य, श्वेता भ्र. श्रिनिवास कुरे व अनील पि. केशवराव कुलकर्णी हे तिघे जण बनावट कागदपत्रांच्या आधारे व दिवाणी न्यायालयासमक्ष प्रलंबीत असलेल्या वरील प्रकरणाची माहीती न देता उक्त मालमत्ता विक्री करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे माझे अशिलांचे निदर्शनास आले आहे. तरी या प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की उक्त मालमत्ते संदर्भाने कुणिही वरील तिघांसोबत कोणताही व्यवहार करु नये. कारण या प्रकारे, माझ्या अशिलांच्या अपरोक्ष व न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत असतांना होणाऱ्या प्रत्येक व्यवहारास मालमत्ता हस्तांतरण कायद्याच्या कलम ५२ ची बाधा उत्पन्न होते, तसेच विकत घेणाऱ्याकडे मालमत्तेची मालकी देखील वैध व कायदेशीररित्या हस्तांतरीत होत नाही. त्यामुळे अशा प्रकारे व्यवहार होऊन कुणाची काही फसवणुक अथवा नुकसान झाल्यास माझे अशील जवाबदार राहणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. ०२.११.२०२३

मार्फत

जाहिर प्रगटन देणार

निरज भोसीकर (पांडे)

अॅडव्होकेट.

अविनाश पि. उमाकांतराव कामठेकर

सौ. नभा भ्र. विवेकराव आंबुलगेकर

दोघेही रा. नांदेड.

**दुकानाची मूळ रजिस्ट्री हरवली**

माझी यशवंतराव रामचंद्र हेंद्रे या नावाची गडगा ता. नायगाव जि नांदेड येथील दुकानाची मूळ रजिस्ट्री मिळकत क्रमांक ५९७ या क्रमांकाची रजिस्ट्री स्नेह नगर ते शिवाजीनगर ऑटो प्रवासात हरवली आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती.

संपर्क पत्ता

यशवंतराव रामचंद्र हेंद्रे, हा. मु. विसावा नगर नांदेड

मोबाईल नंबर ९८८१०२५५५४

**Change In Name**

MY OLD NAME IS **SHAIKH MOHSIN SHAIKH DAWOOD** DEGLOOR DIST NANDED HAVE CHANGED MY NEW NAME: **MOHAMMAD MOHSIN MOHAMMAD DAUD** AT DEGLOOR DIST NANDED.

AND MY FATHER OLD NAME IS **SHAIKH DAWOOD** DEGLOOR DIST NANDED HAVE CHANGED MY FATHER NEW NAME: **MOHAMMAD DAUD** AT DEGLOOR DIST NANDED.

Effective for the future communication please address me with my new.

Sign by .... MOHAMMAD MOHSIN MOHAMMAD DAUD

**जाहिर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. शेख रहिम शेख बाबामियॉं ,रा. लेबर कॉलनी , ता. जि.नांदेड यांनी मौ. अर्धापूर ता. अर्धापूर जि.नांदेड सर्वे नं. २८४ गट क्र. ८२५ मधील क्षेत्र २ हे.९५ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. अर्धापूर ता. अर्धापूर जि.नांदेड सर्वे नं. २८४ गट क्र. ८२५ मधील क्षेत्र २ हे.९५ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही,असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उपजिल्हाधिकारी (सामान्य)

जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**


डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८



**Change In Name**

My Old Name is **MD AHSAN** which now I am changing as New Name **MOHAMMAD AHESAN MD AESMAEL.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - S/o. Anwar Shaikh H.No. 2-5-407/2, Khadakpura, Waghi Road, Near Sara Masjid Barkatpura, Nanded 431601 Mo.No. 8888523216**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# नांदेड शहरात ५८ जणांविरुद्ध वीज चोरी प्रकरणी पोलिसांत गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड परिमंडलात नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात अनधिकृत वीज वापरणाऱ्यांविरुध्द महावितरणतर्फे कडक कारवाई करण्यात येत आहे. वीज बील वसुलीसाठी अनेक प्रयत्न करुनही थकबाकीत असणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित केल्यानंतर परस्पर आणि अनधिकृतपणे आकोडे टाकून किंवा अन्य गैरमार्गाने वीज वापर केल्या प्रकरणी थेट पोलीस कारवाई करण्यात येत आहे. नांदेड शहरासह संपूर्ण परिमंडलात शेकडो अनधिकृत वीज वापरकर्त्याविरुध्द् पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मागील आठवड्यात केवळ नांदेड शहरातच ५८ जणांविरुध्द पोलिसांत गुन्हे दाखल करुन त्यांना चोरुन वीज वापरल्याप्रकरणी १२.९२ लाख रुपयांचे वीज बीलही आकारण्यात आले आहे.

नांदेड शहरातील एमआयडीसी, ग्रामीण उप-विभाग, शहर उप-विभाग-१ आणि शहर उप-विभाग-२ मध्ये अनधिकृत वीज वापरकर्त्याविरुध्द् महावितरणने धडक मोहीम राबविली. त्यांतर्गत शहर व ग्रामीण पोलीस ठाण्यात महेंद्र काशीनाथ जाधव रा. गांधीनगर, बिस्मील्लाखान रहेमान खान रा. वाजेगाव, अब्दुल रजाक अब्दुल वदाब रा.वाजेगाव, प्रभाकर तुकाराम राजेगोरे रा.शेळगाव (ता. अर्धापूर), मंका संभाजी राजेगोरे रा. शेळगाव, इफ्तेकार हुसेन रा.हैदरबाग, सैयद अथर सैयद लदीफ रा. हैदरबाग, जाकिया बेगम शेख जिलानी रा. गुलशन कॉलनी, युसूफखान युनूसखान रा.महेबुबनगर, सोनसळे आनंदा अर्जुनराव रा. खुशीनगर, दत्ता इरन्ना रा. दत्तनगर, धर्माजी पांडूरंग वाव्हळे रा. समतानगर यांचेसह ५८ जणांविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

२१ मार्च २०२६ रोजी भोकर पोलीस ठाण्यात रसुलसाब पिरसाब रा. सोमठाणा (ता.नायगाव), मरीबा खाकू शिरसे रा. सोमठाणा, शंकर भागवत सुरेवाड रा. बरबडा (ता. नायगाव), हणमंत गोविंदराव कदम रा.हिप्परगा (ता.नायगाव), अब्बास मुस्तफा कुरेशी, विक्रम सायबू कायकटवाड, नागोराव गोडमवार, चंद्रप्रकाश राम ढगे, गोविंद भुजंगा बानेवाड, शबाना बबनसाब शेख सर्व रा.घुंगराळा (ता. नायगाव) यांच्या विरुध्द वीज पुरवठा खंडित केल्यानंतर महावितरणच्या परस्पर अनधिकृतपणे वीज वापरल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यांना वीज वापर आणि दंडापोटीही नियमानुसार बील आकारणी करण्यात आली आहे.

## जिल्ह्यात गॅस, पेट्रोल, डिझेलच्या कृत्रिम टंचाईवर लक्ष ठेवा
### –खा. आष्टीकरांच्या प्रशासनाला सूचना

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्यातील पेट्रोल, डिझेल, गॅस टंचाई बाबतीत आलेल्या तक्रारीच्या व सोशल मीडियावर येत असलेल्या बातम्याच्या अनुषंगाने बुधवार, दि. २५ मार्च रोजी हिंगोली लोकसभेचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी यवतमाळ, नांदेड व हिंगोली जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.

यवतमाळ, नांदेड व हिंगोली जिल्ह्यात कुठेही कृत्रिम टंचाई होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना केल्या. तसेच प्रत्येक तालुक्यातील तहसीलदार यांनी या बाबतीत नोडल अधिकारी नेमून पेट्रोल पम्प व गॅस एजन्सीचा साठा तपासणी करून बाहेर तसा फलक लावण्याची सूचना केली आहे. हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात जबाबदार अधिकाऱ्याच्या नेमणुका करा. पेट्रोल, डिझेल व गॅसचा तुटवडा होणार नाही याची दक्षता घ्या, असे निर्देश दिले आहेत.

# ‘माझे गाव – आरोग्य संपन्न गाव’ अभियानाचा १ एप्रिलपासून जिल्ह्यात शुभारंभ

### जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रभावी अंमलबजावणीचे आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील नागरिकांचे आरोग्यमान सुधारण्यासाठी आणि निरोगी समाज निर्मितीसाठी ‘माझे गाव – आरोग्य संपन्न गाव’ हे महत्त्वाकांक्षी अभियान राबविण्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या नियोजनानुसार १ एप्रिल २०२६ पासून संपूर्ण जिल्ह्यात या अभियानाला मोठ्या उत्साहात सुरुवात होणार आहे. अभियानाच्या पहिल्याच दिवशी, म्हणजेच १ एप्रिल २०२६ रोजी, जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ‘विशेष आरोग्य ग्रामसभा’ आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांना अभियानाच्या उद्दिष्टांची सविस्तर माहिती दिली जाईल. आरोग्य, स्वच्छता आणि शुद्ध पाणीपुरवठा या विषयांवर चर्चा करून ग्रामस्थांची भूमिका स्पष्ट केली जाईल. लोकसहभागातून गाव ‘आरोग्य संपन्न’ करण्यासाठी सामूहिक संकल्प केला जाईल.

हे अभियान केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत योजना आणि शाश्वत विकास ध्येयांशी संलग्न आहे. या अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायती, तालुका आणि जिल्ह्यांना राज्यस्तरावर कोट्यवधी रुपयांची पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व सरपंच, ग्रामसेवक, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## लोहा येथील भाजप कार्यालयात पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानास प्रारंभ



**लोहा (प्रतिनिधी)** – लोहा शहरातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात मंगळवार, दि. २४ मार्चपासून पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ चा प्रारंभ झाला आहे. या प्रशिक्षण महाअभियानाचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भाजपाचे लोहा शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष गजानन सूर्यवंशी, उपाध्यक्ष तथा माजी ज्येष्ठ नगरसेवक बबनराव निर्मले, पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियान लोहा अध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्र. जीवन पाटील चव्हाण, भाजपा ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष उतम चव्हाण, गंगाप्रसाद यन्नावार, माजी नगरसेवक युवराज वाघमारे, नागनाथ चुडावकर, नगरसेवक हबीब नबीसाब शेख, मिलिंद पाटील पवार, डी. एन. कांबळे, हनमंत लांडगे, लक्की फुलवरे, मंडळ उपाध्यक्ष गजानन कराडे, यशपाल निर्मले, बाळासाहेब कतुरे, वैभव हाके, बबन नावंदे, लक्ष्मण कांजले, पांडुरंग रहाटकर, आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. संतुकराव हंबर्डे म्हणाले की, भारतीय जनता पार्टी ही धोरणावर चालते, जातीपातीवर ही पार्टी चालत नाही.

## सारखणीचा सराईत गुन्हेगार ३ जिल्ह्यांतून हद्दपार

**नांदेड (प्रतिनिधी** – जिल्ह्यातील सिंदखेड पोलीस ठाण्यांतर्गत विविध गंभीर गुन्हे करून दहशत पसरविणाऱ्या किनवट तालुक्यातील सारखणी येथील सराईत गुन्हेगारास नांदेड, हिंगोली व यवतमाळ या ३ जिल्ह्यांतून ५ महिन्यांकरिता हद्दपार करण्याचे आदेश सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत दोंतुला यांनी पारीत केले आहेत.

सिंदखेड पोलीस ठाणे अंतर्गत सारखणी येथील किशोर प्रेमसिंग राठोड याने विनयभंग, शिवीगाळ, मटका, जुगार व दहशतीचे वातावरण निर्माण केले होते. त्यामुळे त्याला हद्दपार करण्याबाबतचा प्रस्ताव सिंदखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी किनवट यांच्याकडे सादर केला होता.

# कृषी विभाग व पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने एप्रिलमध्ये चार विशेष डिजिटल शेती शाळेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत अभियान स्वरूपात राबविण्यात येणाऱ्या ‘हवामान अनुकूल तंत्रज्ञान बाबत कृषी विभाग व पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने माहे एप्रिल २०२६ मध्ये चार विशेष डिजिटल शेती शाळा घेण्यात येणार आहेत. या डिजिटल शेती शाळांमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा. तसेच प्रत्येक गावातील किमान ३०-४० शेतकऱ्यांनी डिजिटल शेतीशाळेसाठी ऑनलाईन उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

पाणी फाउंडेशनद्वारे संचलित डिजिटल शेती शाळा हे एक ऑनलाईन व्यासपीठ आहे. तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना शास्त्रोक्त आणि पीकनिहाय उत्तम पद्धतींचे मार्गदर्शन झूम आणि युट्यूबच्या माध्यमातून दिले जाणार आहे.

सदर शेती शाळा चार भागांत घेतली जाणार असून, त्याबद्दलचा तपशील नियोजित दिनांकासह खालीलप्रमाणे आहे. भाग १- पेरणीपूर्व तंत्रज्ञान: बेड तयार करणे, बेडवर टोकन करणे, आंतरपीक पद्धत, बीज उगवण क्षमता चाचणी आणि बीज प्रक्रिया- दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी नियोजित. भाग २- जैविक/नैसर्गिक निविष्ठा उत्पादन: बीजामृत, जीवामृत, घन जीवामृत, लिंबोळी अर्क, दशपर्णी अर्क उत्पादन. नियोजित दि. ८ एप्रिल २०२६. भाग ३- एकात्मिक कीड व्यवस्थापन: सापळा पिके, पक्षी थांबे, चिकट सापळे, मित्र कीटक, लिंबोळी आणि दशपर्णी अर्काचा वापर. नियोजित दि. १५ एप्रिल २०२६. भाग ४- भात शेतीचे लागवड तंत्र: भाताची थेट पेरणी, श्री पद्धत आणि भात लावणीसाठी यांत्रिकी पद्धत. नियोजित दि. २२ एप्रिल २०२६.

या शेतीशाळेस कृषी विभागांतर्गत उप कृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, समूह सहायक, कृषी ताई व कृषी सखी तसेच पशुसंवर्धन विभाग अंतर्गत पशुसंवर्धन विकास अधिकारी, पशुसंवर्धन पर्यवेक्षक व पशुसखी हे उपस्थित राहतील. तसेच प्रत्येक गावात एका मध्यवर्ती ठिकाणी ४०-५० शेतकरी एकत्रित उपस्थित राहतील असे नियोजित आहे.

उपरोक्त शेती शाळा नियोजित दिनांका दिवशी सायंकाळी ७.३० वाजता सुरू करण्यात येणार आहे. तसेच सदर डिजिटल शेतीशाळेची लिंक गावनिहाय शेतकरी यांचे व्हॉअसअपद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल, असे कृषी अधीक्षक कृषी कार्यालयाने कळविले आहे.

## गणपत सुनेवाड यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – बिलोली तालुक्यातील आदमपूर येथील रहिवासी गणपत हाणमंतू सुनेवाड यांचे मंगळवार, दि. २४ मार्च रोजी अल्पशा आजाराने सायंकाळी ६ वाजता निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. २५ मार्च रोजी सकाळी १२ वाजता आदमपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात भावजय, बहिणी, भाऊजी, पुतणे, पुतणी असा परिवार आहे. सायलू पोचीराम सुनेवाड, हाणमंतू सुनेवाड, मारोती बाबा सुनेवाड यांचे ते काका होत.

## राजभवन येथे भव्य शिवस्मारक उभे करावे –संभाजी ब्रिगेड

**नांदेड (प्रतिनिधी)** –विश्ववंद्य छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण जगाचे ऊर्जा स्त्रोत असून, जगातील एकमेव आदर्श राजे होते. त्यांचे भव्य शिवस्मारक मुंबई येथे उभारावे, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक राजभवन येथे उभारावे यासाठी संभाजी ब्रिगेडने वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. परंतु अद्याप या मागणीची दखल घेण्यात आली नाही. तेव्हा या मागणीची दखल घेऊन त्वरित शिवस्मारक उभारावे, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्यावतीने करण्यात आली आहे.

संभाजी ब्रिगेडचया या महत्त्वपूर्ण मागणी दखल घेतली नाही तर येत्या



काळात छत्रपती शिवरायांच्या सन्मानात संभाजी ब्रिगेडमोठे आंदोलन उभे करेल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनान्वये दिला आहे

यावेळी निवेदन देताना संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, लोकसभा अध्यक्ष परमेश्वर पाटील, जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, जिल्हाध्यक्ष कमलेश कदम, कुंडलिक शिंदे, सुनील पाटील, ज्ञानेश्वर हंगरगे, सुमित जाधव, राम डाखोरे, साई पावडे, ऋषी बोकारे यांच्यासह संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### मालमत्ता थकबाकीदारांवर महापालिकेची धडक कारवाई
# मागील महिन्याभरात तबबल १६५ नळ खंडित

**नांदेड (प्रतिनिधी)**– महापालिकेच्या कर विभागामार्फत मालमत्ता कर वसुली मोहिमेला गती देण्यात आली असून, थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कठोर कारवाई करण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत मागील महिन्याभरात तब्बल १६५ मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन बंद करण्यात आले आहेत.

आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार आणि उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांच्या मार्गदर्शनाखाली जप्ती पथकाकडून ही मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येत



आहे. शहरातील थकबाकीदार मालमत्ता- धारकांना वारंवार सूचना, नोटिसा देऊनही काही थकबाकीदारांकडून कर भरण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे महानगरपालिकेने आता कठोर भूमिका घेत कर थकीत असलेल्या मालमत्ताधारकांचे नळ व ड्रेनेज कनेक्शन बंद करण्यात आले असून, कोणतीही सूट किंवा तडजोड न करता थकबाकीदारांवर थेट नळ खंडित करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

मालमत्ता कर थकबाकीदारांची अचूक माहिती, क्षेत्रनिहाय नियोजन आणि वेळापत्रकबद्ध कारवाई या तीन बाबींवर भर देऊन ही मोहीम राबविण्यात येत आहे. प्रत्येक विभागीय कार्यालयामार्फत रोजच्या आढाव्यानुसार प्रगती तपासली जात असून, थकबाकीदारांनी तातडीने कर भरणा केल्यास जप्ती कारवाई टाळता येऊ शकेल. त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कर भरून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. डोईफोडे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## पिस्तुलासह १८ जीवंत काडतूस बाळगणारा एलसीबीच्या जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या विविध भागांत कमरेला विनापरवाना पिस्तूल लावून परिसरात दहशत पसरविणारा गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला. पोलिसांनी त्याच्याकडून एक पिस्तूल आणि १८ जिवंत काडतूस जप्त केले आहेत. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांच्या टीमने केली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांच्या टिमला आदेश दिल्याने दि. २५ मार्च रोजी कोरे व त्यांची टिम पोलीस स्टेशन वजिराबाद हद्दीत पेट्रोलींग करीत असताना त्यांना गोपनीय खात्रीशीर माहिती मिळाली की, एक इसम अवैधरित्या गावठी पिस्टल विक्री करण्याचे उद्देशाने बाळगुन हस्सापूर रोडवरील वाघी चौक नांदेड येथे रोडवर थांबलेला आहे. या माहितीप्रमाणे आरोपीचा शोध घेतला असता माहितीच्या ठिकाणी एक इसम मिळून आला. त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव नागेंद्र ऊर्फ दत्ता श्रीहरी भारती (वय २२ वर्षे रा. जिदमनगर गोपाळ चावडी ता. जि. नांदेड) असे असल्याचे सांगितले. नमूद आरोपीची दोन पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता त्याचेकडे १ गावठी पिस्तूल व १८ जिवंत काडतुस असा एकूण ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.







**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com